दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२६ | मंगळवार दि.१४ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### साखर उद्योगाचे गोडवे हरवले: संकटातून मार्ग कोणता?

राज्यातील साखर उद्योग आज अभूतपूर्व आर्थिक संकटाच्या उंबरठ्यावर उभा आहे. प्रतिटन उसाच्या गाळपामागे सुमारे ७०० रुपयांपर्यंत तोटा होत असल्याचा कारखानदारांचा दावा केवळ आकड्यांपुरता मर्यादित नसून, तो संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या हालचालींना हादरा देणारा आहे. या पार्श्वभूमीवर सहकारमंत्री बाबासाहेब पाटील आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी साखर कारखानदारांची नियोजित भेट ही परिस्थितीची गंभीरता अधोरेखित करते.

# शेतमालाच्या हमीभावावर हायकोर्टात सुनावणी

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**देशातील शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांना किमान आधारभूत किंमत (एमएसपी) म्हणजेच हमीभाव देण्याच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालय यांनी केंद्र सरकारला भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणी सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठासमोर सोमवारी (दि. १३) सुनावणी झाली. महाराष्ट्रातील प्रकाश गोपाळराव पोहरे, पुरुषोत्तम गवाडे आणि विशाल ओमप्रकाश रावत या शेतकऱ्यांनी संविधानाच्या कलम ३२ अंतर्गत जनहित याचिका दाखल केली आहे. यामध्ये शेतमालाचा हमीभाव 'सी२' सूत्रानुसार जाहीर करण्याचे निर्देश केंद्र सरकारला द्यावेत, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.**



याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे की, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा पूर्ण खर्च परत मिळणे आवश्यक असून त्यावर किमान नफा मिळालाच पाहिजे. त्यामुळे हमीभाव निश्चित करताना बियाणे, खते, पाणी, मजुरी यांसह जमिनीचे भाडे, भांडवली गुंतवणूक आणि कर्जावरील व्याज अशा सर्व घटकांचा समावेश असलेला 'सी२' खर्च गृहित धरावा. तसेच, शेतकऱ्यांना हमीभावाने आपला माल विकायचा असल्यास सरकारने तो संपूर्ण खरेदी करावा, अशीही मागणी याचिकेत करण्यात आली आहे. सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांचे वकील प्रशांत भूषण यांनी न्यायालयासमोर महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले. त्यांनी सांगितले ▶▶ पान २ वर

### सर्वोच्च न्यायालय काय म्हणाले?

सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणाले की, ''किमान आधारभूत किंमत निश्चित करणे सोपे नाही. त्यात अनेक आकडेमोड कराव्या लागतात. जमीन आणि भांडवली खर्च प्रत्येक राज्यात आणि प्रत्येक जिल्ह्यात वेगवेगळा असतो, त्यामुळे देशभरात एकच नियम लागू करणे अवघड होऊ शकते, असे त्यांनी निरीक्षण नोंदवले. तसेच सर्व शेतकऱ्यांची परिस्थिती सारखी नसते. काहींकडे जमिनीचे मोठे तुकडे आहेत, तर काहींकडे खूपच कमी आहेत. त्यामुळे सर्वांसाठी एकसमान धोरण तयार करणे आव्हानात्मक आहे, असे खंडपीठाने सुनावणी दरम्यान स्पष्ट केले. वकील भूषण यांनी युक्तिवाद करताना सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा मुद्दा उपस्थित केला.''सरकारने मोफत रेशन देणे ठीक आहे. पण त्याचा परिणाम शेतकऱ्यांवर असा व्हायला नको की त्यांना उत्पन्नची हमीच राहणार नाही. अन्यथा शेतकरी आत्महत्या करत राहतील, असे ते म्हणाले.





## थोडक्यात...

### बीडमध्ये लाचखोर अधिकाऱ्यास अटक!

बीडः येथील शासकीय निरीक्षण गृहाचा प्रभारी अधीक्षक कपिल कांबळे यास तीस हजार रुपयांची लाच घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली. कार्यालयात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्याचा हजेरी अहवाल सुरळीतपणे वरिष्ठांकडे पाठवण्यासाठी आणि संबंधित आदेश काढण्यासाठी कपिल कांबळे याने ४५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती ३० हजार रुपये देण्याचे ठरले. याप्रकरणी रविवारी तक्रार प्राप्त झाली होती. तक्रारीची शहानिशा केल्यानंतर जालना एसीबीच्या पथकाने सोमवारी पालवण चौक परिसरात सापळा रचला. यावेळी लाचेची ३० हजार रुपयांची रक्कम स्वीकारताना कांबळे याला रंगेहात पकडून ताब्यात घेण्यात आले. दरम्यान घरझडतीसाठी बीड एसीबीचे एक पथक रवाना केले असून पुढील कारवाई सुरु आहे. सातत्याने होत असलेल्या लाचखोरीच्या कारवाईने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. ही कारवाई जालना एसीबीचे पोलिस अधीक्षक बाळासाहेब जाधवर व त्यांच्या टीमने केले.

### इराणचा भारताला दिलासा!

नवी दिल्ली/तेहरान : अमेरिका आणि इस्रायलने इराणची नाकेबंदी करण्याची तयारी सुरू केलेली असतानाच, इराणने भारताबाबत महत्त्वाची भूमिका मांडली आहे. होर्मुझच्या समुद्रधुनीतून भारतीय जहाजांच्या वाहतुकीबाबत इराणचे केंद्र सरकारशी 'सकारात्मक संबंध' असल्याचे इराणने म्हटले आहे. भारतातील इराणचे राजदूत डॉ. मोहम्मद फताली यांनी स्पष्ट केले की, ''भारतीय जहाजांच्या संदर्भात आमचे भारत सरकारशी अतिशय सलोख्याचे संबंध आहेत. आमच्या परराष्ट्र मंत्र्यांनी भारताचा उल्लेख इराणच्या पाच प्रमुख मित्र राष्ट्रांमध्ये केला आहे. त्यामुळे भारतीय जहाजांच्या सुरक्षित प्रवासासाठी आम्ही पूर्णपणे सकारात्मक आहोत.'' अमेरिकेने इराणवर लादलेल्या निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर इराणची ही भूमिका भारतासाठी दिलासादायक मानली जात आहे. तुर्कीने होर्मुझच्या समुद्रधुनीबाबत चिंता व्यक्त केली आहे. तुर्कीचे परराष्ट्र मंत्री हाकान फिदान यांनी सांगितले की, ''या जलमार्गावर आंतरराष्ट्रीय सशस्त्र सैन्य तैनात करणे अधिक अडचणीचे ठरेल. मुत्सद्देगिरीच्या माध्यमातूनच हा मार्ग खुला व्हायला हवा. अमेरिका आणि इराणमधील चर्चा निष्फळ ठरल्यानंतर फिदान यांनी ही प्रतिक्रिया दिली असून, कोणत्याही देशाला या युद्धाचा विस्तार नको असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शांतता कराराचा भाग म्हणून इराणमधील समृद्ध युरेनियमचा ( ) साठा स्वतःकडे घेण्याची तयारी रशियाने दर्शवली आहे. रशियाचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह म्हणाले की, ''राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी हा प्रस्ताव अमेरिका आणि इतर प्रादेशिक देशांसमोर आधीच ठेवला आहे. अमेरिकन युद्धनौका नाकेबंदी करण्यासाठी सज्ज होत असतानाच, इराणशी संबंधित दोन तेलवाहू जहाजांनी सोमवारी होर्मुझची समुद्रधुनी ओलांडली. 'ऑरोरा' आणि 'न्यू फ्युचर' अशी या जहाजांची नावे असून ती इराणची तेल उत्पादने आणि डिझेल घेऊन जात असल्याचे 'केपलर'च्या आकडेवारीतून समोर आले आहे.

## सूरही गहिवरले..! सूरसम्राज्ञी आशा भोसले अनंतात विलीन; शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**मुंबई । प्रतिनिधी**

**संपूर्ण देशाला आपल्या सुरांनी मंत्रमुग्ध करणाऱ्या ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना आज साश्रू नयनांनी अखेरचा निरोप देण्यात आला. तब्बल सहा दशकं रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा त्यांचा अमर आवाज आज कायमचा शांत झाला. त्यांच्या पार्थिवावर मुंबईतील शिवाजी पार्क स्मशानभूमी येथे दुपारी ४ वाजता शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.**

१२ एप्रिल रोजी वयाच्या ९३व्या वर्षी मुंबई येथे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यानंतर आज सकाळी लोअर परेल येथील निवासस्थानी त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. या वेळी सिनेसृष्टी, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून त्यांना




श्रद्धांजली अर्पण केली. अंत्यदर्शनासाठी अभिनेत्री तब्बू, आशा पारेख, अभिनेता रितेश देशमुख, गायक सुदेश भोसले, अभिनेते राकेश रोशन, नीना गुप्ता तसेच उद्धव ठाकरे, सुप्रिया सुळे, आशिष शेलार यांसारख्या मान्यवरांनी हजेरी लावली. यावेळी मुंबई पोलिसांकडून त्यांना मानवंदना देण्यात आली. भारतरत्न लता मंगेशकर यांच्या लहान भगिनी असलेल्या आशाताईंनी हिंदीसह मराठी, बंगाली, गुजराती, तमिळ, ▶▶ पान २ वर

# नगर-कल्याण महामार्गावर भीषण अपघातात ११ ठार

**मुंबई । प्रतिनिधी**

कल्याण-मुरबाड मार्गावर काळजाचा थरकाप उडवणारी घटना सोमवारी घडली. एक सिमेंट मिक्सर आणि काळी-पिवळी ईको टॅक्सी यांच्यात समोरासमोर भीषण धडक झाली. या अपघातात ११ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. हा अपघात इतका भीषण होता की, ईको कारचा अक्षरशः चक्काचूर झाला असून गाडीचा



सांगाडा ओळखणेही कठीण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रायते येथील पांजरा पुलावर सकाळी ११ च्या सुमारास ही घटना घडली. ईको गाडीतून मुरबाडमधील काही रहिवासी कल्याणच्या दिशेने जात होते. याच दरम्यान पांजरा पुलावर समोरून येणाऱ्या सिमेंट मिक्सरने कारला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात एक आजी आश्चर्यकारकरीत्या बचावल्या आहेत. प्रवाशांनी भरलेल्या ईको कारला झालेली धडक इतकी भीषण होती की, कारमधील प्रवाशांना सावरण्याची संधीही मिळाली नाही. या कारमध्ये एकूण १२ प्रवासी ▶▶ पान २ वर

## भाजपकडून मित्रपक्षांची शिकार होणार-रोहित पवार

**मुंबई । प्रतिनिधी**



**सध्या सत्ताधारी महायुतीतील घटक पक्षांकडून विरोधी पक्षातील आमदार-खासदार फोडण्याच्या चर्चा रंगत असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित यांनी सत्तेतील मोठ्या पक्षाकडून त्यांच्या स्वतःच्याच मित्रपक्षांची शिकार होणार असल्याचा दावा केला आहे.**

यासंदर्भात केलेल्या एक्स पोस्टमध्ये रोहित पवार यांनी म्हटले आहे की, भाजपच्या मित्रपक्षांकडून विरोधी पक्षाचे आमदार, ▶▶ पान २ वर

# महाराष्ट्राला मिळणार २७ नवे आमदार?

**मुंबई । प्रतिनिधी**

### आयोगाकडून हालचालींना वेग

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्याने आता विधानपरिषदेतील अनेक दिवसांपासून रिक्त असलेल्या जागांवर निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे येत्या तीन महिन्यांत महाराष्ट्राला तब्बल २७ नवे आमदार मिळण्याची शक्यता निर्माण झाली असून निवडणूक आयोगाकडून यासाठी चाचपणी सुरू आहे.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून द्यायच्या १७ जागा गेल्या तीन वर्षांपासून रिक्त होत्या. संबंधित संस्थांमध्ये मतदारसंख्या उपलब्ध नसल्यामुळे या जागांवर निवडणुका होऊ शकल्या नव्हत्या. मात्र अलीकडेच नगरपालिका, महापालिका तसेच काही जिल्ह्यांतील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका झाल्याने परिस्थिती बदलली आहे. दरम्यान, उर्वरित काही जिल्ह्यांमध्ये ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यामुळे निवडणुका झालेल्या नसल्या तरी, ७५ टक्क्यांपेक्षा जास्त मतदार ▶▶ पान २ वर

## आशा भोसले यांच्या नावाने मुंबईत संगीत अकॅडमी

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांना मंजुरी देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत एकूण आठ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित आशा भोसले यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृती जपण्यासाठी राज्य सरकारनेह्या 'आशा भोसले संगीत अकॅडमी' उभारण्याचा निर्णय घेतला आहे. याआधी स्वत: आशाताईंनी वांद्रे-अंधेरी परिसरात जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. मंत्रिमंडळ बैठकीत मंत्री प्रताप सरनाईक यांनी त्यांच्या नावाने स्मारक उभारण्याचा मुद्दा मांडला. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी आशाताईंनी दिलेल्या प्रस्तावालाच पुढे नेण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले.

## युद्धाची झळ स्वयंपाकघरापर्यंत, खाद्यतेलाचा उडाला भडका !

**दिल्ली । वृतसंस्था**

देशातील खाद्यतेलाच्या आयातीने मार्च महिन्यात मोठी उसळी घेतली असून, वार्षिक स्तरावर यात १२ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. सॉल्व्हेंट एक्स्ट्रॅक्टर्स असोसिएशन ऑफ इंडियाने (सी) जाहीर केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार, गेल्या महिन्यात एकूण ११.७३ लाख टन खाद्यतेलाची आयात झाली आहे.

प्रामुख्याने कच्च्या पाम तेलाच्या शिपमेंटमध्ये झालेल्या वाढीमुळे हा आकडा वधारला असल्याचे दिसून येते. मार्च २०२५ मध्ये हाच आकडा १०.४५ लाख टन इतका होता. ▶▶ पान २ वर

## मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेत शेतकरी गट व वराह पालनाचा समावेश

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात पशुधनावर आधारित उद्योजकता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना घोषित करण्यात आली आहे. या योजनेत आता मुरघास संयंत्र वाटप योजनेत शेतकरी समूह गटाचा तसेच वराह पालन व्यवसायाचाही समावेश करण्यात आला असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.**

पशुसंवर्धन विभागाने यासंदर्भातील सुधारित शासन निर्णय प्रसिद्ध केला. या निर्णयामुळे मुरघास संयंत्रांच्या माध्यमातून वैरण विकासाला चालना मिळणार असून पशुपालकांसाठी स्थिर व परवडणारा चारा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. विशेषतः समूह पातळीवर काम केल्यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन ग्रामीण भागात



उद्योजकतेच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत. या निर्णयानुसार आता वैयक्तिक लाभार्थ्यांबरोबरच शेतकरी उत्पादक संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, आत्मा अंतर्गत नोंदणीकृत शेतकरी समूह गट, महिला आर्थिक विकास महामंडळाकडे नोंदणीकृत असलेली समुदाय आधारित संसाधन केंद्रे आणि उमेद नोंदणीकृत प्रभाग संघ यांनाही या योजनेत सहभागी होता येणार आहे. यासाठी संबंधित संस्थांकडे किमान ५० सदस्य, ५ लाख रुपये भागभांडवल आणि मागील ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: १७८.५० क्विंटल | १,९४० | २,९०० | २,२७८ |
| ज्वारी/हायब्रिड: २०३.५० क्विंटल | १,८०० | ५,१०१ | २,९१४ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १९.५० क्विंटल | ७,२०० | ७,४०० | ७,३०० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: ११३.०० क्विंटल | २,३६१ | २,९०१ | २,५६७ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| हरभरा: ३.५० क्विंटल | ४,४०१ | ५,१५० | ४,७७५ |



अग्रलेख

# साखर उद्योगाचे गोडवे हरवले: संकटातून मार्ग कोणता?

राज्यातील साखर उद्योग आज अभूतपूर्व आर्थिक संकटाच्या उंबरठ्यावर उभा आहे. प्रतिटन उसाच्या गाळपामागे सुमारे ७०० रुपयांपर्यंत तोटा होत असल्याचा कारखानदारांचा दावा केवळ आकड्यांपुरता मर्यादित नसून, तो संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या हालचालींना हादरा देणारा आहे. या पार्श्वभूमीवर सहकारमंत्री बाबासाहेब पाटील आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी साखर कारखानदारांची नियोजित भेट ही परिस्थितीची गंभीरता अधोरेखित करते. साखर उद्योग हा केवळ एक उद्योग नसून, तो लाखो ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित आहे. मात्र, सध्या या उद्योगासमोर अनेक पातळ्यांवर संकटे उभी ठाकली आहेत.

साखरेचा विक्री दर दीर्घकाळ ३१ रुपयांवर स्थिर राहिला आहे, तर उसाचा दर २७५० रुपयांवरून ३५५० रुपयांपर्यंत वाढला आहे. या वाढत्या तफावतीमुळे एफआरपी आणि बाजारभाव यांच्यातील समतोल बिघडून तोट्याची दरी अधिकच खोल होत आहे. यात भर म्हणजे इथेनॉल धोरणातील बदल. राज्याची इथेनॉल उत्पादन क्षमता प्रचंड असताना, केंद्र सरकारकडून मिळालेली मर्यादित परवानगी ही उद्योगासाठी धक्कादायक ठरली आहे. मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करूनही केवळ ३२ टक्के क्षमतेचा वापर होणे म्हणजे संसाधनांचा अपव्ययच म्हणावा लागेल. इथेनॉल उत्पादनातून अपेक्षित नफा न मिळाल्याने उद्योगाची आर्थिक कंबर मोडत आहे. याशिवाय जागतिक परिस्थितीनेही साखर उद्योगाला फटका बसला आहे. पश्चिम आशियातील तणावामुळे होर्मुझ सामुद्रधुनीत अडकलेली साखर निर्यात, तसेच जहाजांच्या टंचाईमुळे अडकून पडलेली अतिरिक्त साखर या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे निर्यातीवर मर्यादा आणि उद्योगावर आर्थिक बोजा. निर्यात हा एकमेव पर्याय उरलेला असताना त्यालाच अडथळे येत असल्याने परिस्थिती अधिकच बिकट बनली आहे. देशांतर्गत मागणीत झालेली घट ही आणखी एक चिंताजनक बाब आहे. एलपीजी तुटवडा, बदलते उपभोग पॅटर्न आणि औद्योगिक मागणीत घट यामुळे साखरेचा वापर कमी झाला आहे. परिणामी उत्पादन असूनही विक्री मंदावली आहे.

या सगळ्या संकटाचा थेट फटका शेतकऱ्यांना बसत आहे. सुमारे ५ हजार कोटी रुपयांपर्यंत गेलेली थकबाकी ही केवळ आर्थिक आकडेवारी नाही, तर शेतकऱ्यांच्या जगण्याशी संबंधित प्रश्न आहे. उत्पादन खर्च वाढत असताना उत्पन्न अनिश्चित राहणे, हे ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी धोकादायक संकेत आहेत. यावर उपाय म्हणून विविध मागण्या पुढे आल्या आहेत. साखरेच्या किमान विक्री किमतीत वाढ, निर्यातीसाठी अनुदान, इथेनॉल दरवाढ, सॉफ्ट लोन, पाणीपट्टीत सवलत, तसेच उसाला प्रतिटन अनुदान. या मागण्या केवळ तात्पुरत्या दिलास्यासाठी नसून, उद्योगाच्या पुनरुज्जीवनासाठी अत्यावश्यक आहेत. परंतु, या समस्येचा दीर्घकालीन विचार करणे अधिक गरजेचे आहे. साखर उद्योगाला केवळ साखरेपुरते मर्यादित न ठेवता, बायो-एनर्जी, इथेनॉल, वीज निर्मिती अशा विविध क्षेत्रांमध्ये संतुलित वाढ साधणे आवश्यक आहे. धोरणात्मक स्थैर्य, बाजारातील लवचिकता आणि शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण या तिन्ही गोष्टींचा समन्वय साधल्याशिवाय या संकटातून मार्ग निघणार नाही. आजची परिस्थिती ही इशारा आहे. उद्योग, शासन आणि शेतकरी यांच्यातील समन्वय ढासळल्यास परिणाम किती गंभीर होऊ शकतात, याचे. साखर उद्योग वाचवणे म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्था वाचवणे. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारांनी तातडीने ठोस, दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेणे ही काळाची गरज आहे.

# संघर्षातून उभ्या राहिलेल्या कर्तृत्ववान नेत्या डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे



स्व.अजितदादा पवार यांच्या अकाली निधनामुळे संपूर्ण राज्य शोकाकुल आहे. या दुःखात सहभागी होत, डॉ. ज्योतीताई मेटे यांनी आपला आजचा १४ एप्रिलचा वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे.परंतु या निमित्ताने लोकनेते विनायकराव मेटे साहेबांच्या विचारांचा वारसा आणि 'शिवसंग्राम' संघटनेची धुरा अत्यंत समर्थपणे सांभाळणाऱ्या आदरणीय डॉ.ज्योतीताई मेटे यांचा आजवरच्या प्रवासाचा आणि कार्याचा घेतलेला हा अल्पसा आढावा.

नेतृत्व म्हणजे केवळ पद नव्हे, तर संकटकाळात धैर्याने उभे राहून जनमानसाचा विश्वास संपादन करणे होय.लोकनेते स्वर्गीय विनायकराव मेटे साहेबांच्या निधनानंतर पोरक्या झालेल्या शिवसंग्राम परिवाराला आईच्या मायेने सावरणारे आणि साहेबांच्या विचारांची मशाल धगधगती ठेवणारे व्यक्तिमत्व म्हणजे डॉ.ज्योतीताई मेटे. प्रशासकीय अनुभवाची शिदोरी आणि संघर्षाची जोड देत त्यांनी अल्पावधीतच महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. डॉ. ज्योतीताई मेटे यांची ओळख केवळ एका नेत्याची पत्नी एवढीच मर्यादित नाही. त्या स्वतः एक उच्चशिक्षित आणि वैचारिक प्रगल्भता असलेल्या व्यक्तिमत्व आहेत. स्व. विनायकराव मेटे साहेबांनी आयुष्यभर मराठा आरक्षणासाठी आणि उपेक्षितांच्या न्यायासाठी जो लढा दिला, त्या लढ्यात डॉ. ज्योतीताई सावलीसारख्या त्यांच्या पाठीशी होत्या. साहेबांच्या अचानक जाण्याने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला असताना, त्यांनी स्वतःला सावरले आणि ''साहेबांचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल,'' हा निश्चय करून त्या जनसेवेच्या मैदानात उतरल्या. विनायकराव मेटे साहेबांनंतर शिवसंग्राम संघटनेचे काय होणार, असा प्रश्न अनेकांना पडला होता. मात्र, डॉ. ज्योतीताईंनी संघटनेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारून कार्यकर्त्यांना आधार दिला. त्यांनी केवळ गाठीभेटी घेतल्या नाहीत, तर राज्याच्या कानाकोपऱ्यात जाऊन शिवसंग्रामचा विचार जिवंत ठेवला. अरबी समुद्रातील शिवस्मारकाचा प्रश्न असो किंवा मराठा आरक्षणाचा लढा, डॉ. ज्योतीताईंनी तितक्याच आक्रमकपणे आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने आपली बाजू मांडलेली आहे. आरोग्य शिबिरे, गरजू विद्यार्थ्यांना मदत आणि महिला सक्षमीकरणासाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला असून, राजकारणा पलीकडे जाऊन 'माणुसकी' जपणाऱ्या नेत्या म्हणून आज त्यांची ओळख निर्माण झाली आहे. नुकत्याच संपन्न झालेल्या बीड नगरपालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीशी (अजित पवार गट) युती करून बीड नगरपालिका ताब्यात आणण्यात त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. मागील काळात पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीतही ७० हून अधिक ग्रामपंचायतींवर शिवसंग्रामचा झेंडा फडकवून त्यांनी आपल्या जनधाराची प्रचिती दिली. बीड कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये पंडितराव माने व सचिन काळकुटे अशी दोन खरेदी-विक्री संघात ज्येष्ठ शिवसंग्राम नेते गोपीनाथ बापू घुमरे तसेच बीड तालुका मजूर फेडरेशनमध्ये बाळासाहेब हावळे यांच्या रूपाने एका संचालकांची नियुक्ती करून त्यांनी सहकार क्षेत्रावरही आपली पकड मजबूत केली आहे. लोकसभा निवडणुकीत स्वतःची उमेदवारी दाखल न करता, समाजाच्या आग्रहास्तव आणि व्यापक हितासाठी त्यांनी घेतलेली भूमिका बीडचा खासदार निवडून आणण्यात निर्णायक ठरली. आज जिल्ह्यात शिवसंग्रामकडे एक लाखापेक्षा अधिक हक्काचे 'कॅडर' मतदान आहे, जे कोणत्याही पक्षासाठी विजयाचे समीकरण ठरवणारे आहे.लोकनेते मेटे साहेबांनी ज्या जिद्दीने मराठा आरक्षणाचा लढा लढला, तोच वारसा ज्योतीताई तितक्याच आक्रमकपणे पुढे नेत आहेत. विद्यार्थी व युवकांच्या एमपीएससी परीक्षेसाठी मुदतवाढ मिळवणे असो, सारथी' योजनेची प्रभावी अंमलबजावणी असो किंवा अण्णासाहेब पाटील महामंडळाद्वारे युवकांना कर्ज उपलब्ध करून देणे; ताईंनी प्रशासनाशी सातत्याने पत्रव्यवहार करून हे प्रश्न मार्गी लावले आहेत. अरबी समुद्रातील शिवस्मारक पूर्ण व्हावे, ही त्यांची प्रमुख जिद्द आजही कायम आहे. डॉ. ज्योतीताईंचे राजकारण हे केवळ सत्तेसाठी नसून ते समाजपरिवर्तनासाठी आहे. मेटे साहेबांनी शिरूर तालुका दत्तक घेऊन जो स्त्री-पुरुष प्रमाण सुधारण्याचा पॅटर्न राबवला होता, तोच वारसा पुढे नेत ताईंनी साहेबांचे मूळ गाव 'राजेगाव येथे ' ग्रामपंचायत दत्तक योजने अंतर्गत मुलीच्या जन्मानंतर तिच्या नावे 'फिक्स डिपॉझिट' करण्याचा स्तुत्य उपक्रम त्या स्वखर्चाने राबवत आहेत. ''कार्यकर्ता हाच पक्षाचा कणा आहे,'' हे ओळखून त्यांच्या सुरक्षिततेसाठी विमा उतरवणारा शिवसंग्राम हा महाराष्ट्रातील एकमेव पक्ष ठरला आहे. ही संकल्पना ज्योतीताईंच्या संवेदनशील नेतृत्वाची साक्ष देते. लोकनेते विनायकराव मेटे साहेबांच्या सामाजिक कार्याच्या प्रेरणेतून व डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या संकल्पनेतून बीड जिल्हा शिवसंग्रामच्या वतीने भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. यामध्ये एकाच छताखाली राज्यातील ४० नामांकित कंपन्यांत ०५ हजार नोकऱ्या उपलब्ध करून देण्यात आल्या. हा मेळावा बीड येथे यशस्वीपणे संपन्न झाला. एक माजी सनदी अधिकारी म्हणून लाभलेला प्रशासकीय अनुभव आणि सामाजिक जाण यामुळे ज्योतीताईंची ओळख महाराष्ट्राला एक सुसंस्कृत नेत्या म्हणून झाली आहे. शासकीय आयटीआयला कै. विनायकराव मेटे साहेबांचे नाव मिळवून देणे,नगरपालिका नगरोथान योजने अंतर्गत रस्ते विकास तसेच श्रीक्षेत्र नारायणगड, श्री.कंकालेश्वर मंदिर, तसेच हजरत शहेंशावली दर्गाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी खेचून आणणे, हे त्यांच्या अभ्यासू वृत्तीचे फळ आहे. याच गुणांमुळे आज 'राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदासाठी' त्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जात आहे. बीड विधानसभा निवडणूक लढवून त्यांनी आपली राजकीय ताकद तर सिद्ध केलीच आहे, पण त्याही पलीकडे जाऊन कार्यकर्त्यांची एक मोठी फौज त्यांनी उभी केली आहे. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सर्व जागा स्वबळावर लढवण्यासाठी शिवसंग्रामची मोट बांधणी पूर्ण झाली आहे. आज डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या नेतृत्वाखाली शिवसंग्राम संघटना पुन्हा एकदा नव्या जोमाने उभी राहत आहे. साहेबांच्या विचारांचे अधिष्ठान आणि ज्योतीताईंचे आधुनिक, सुशिक्षित नेतृत्व यामुळे थोरा मोठ्यांसाह तरुणांचा त्यांच्यावरील विश्वास वाढत आहे. संघर्षाच्या काळात डगमगून न जाता, धैर्याने संकटाचा सामना कसा करावा, याचे त्या एक उत्तम उदाहरण आहेत. डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना उदंड आयुष्य लाभो आणि त्यांच्या हातून लोकनेते विनायकराव मेटे साहेबांचे 'स्वराज्य' घडवण्याचे स्वप्न पूर्ण होवो, हीच सदिच्छा त्यांच्या या पुढील वाटचालीस महाराष्ट्रभरातील शिवसंग्राम मावळे आणि हितचिंतकांकडून मनःपूर्वक शुभेच्छा...



अतुल पी.लांगोरे

# महात्मा ज्योतिराव फुले यांची १९९ वी जयंती साजरी



**परतूर । प्रतिनिधी**

शिवराज महाविद्यालयात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची १९९ वी जयंती मोठ्या उत्साहात आणि अभिवादनपर वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महात्मा फुलेंच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्रांतीच्या विचारांना उजाळा देण्यात आला.कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एस. आर. नाटकर यांच्या हस्ते महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषवताना महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी महात्मा फुलेंच्या कार्यावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की: ''विद्येविना मती गेली...'' या सूत्राद्वारे महात्मा फुलेंनी शिक्षणाचे महत्त्व जगाला पटवून दिले. आजच्या आधुनिक युगातही त्यांचे सामाजिक समतेचे विचार तितकेच सुसंगत आहेत. शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या प्रश्नांवर त्यांनी दिलेला लढा आजही प्रेरणादायी आहे. याप्रसंगी काही विद्यार्थ्यांनीही महात्मा फुलेंच्या जीवनावर आधारित आपली मनोगते व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या भाषणातून महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी घेतलेल्या कष्टांची माहिती दिली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य, सर्व विभागांचे विभागप्रमुख, राष्ट्रीय सेवा योजना () प्रमुख प्रा.जी.बी.मोरे तसेच प्रा.सी.एस.राजपुत, प्रा.एस.एल.शाहीर, प्रा.जी.बी.डव्हारे, प्रा.बी.एम.शेंडगे, प्रा.पी.एस.सुरुंग, प्रा.एस.ए.देशपांडे, प्रा.ए.एस.गायकवाड, प्रा.एन.बी.गायकवाड, प्रा.एम.एस.सराफ, प्रा. ए.एस.चुंगडे, प्रा. के.जी.चव्हाण, प्रा. व्हि.व्हि.गिते शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.जी.बी.मोरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. शिवराज महाविद्यालयाने या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव आणि महापुरुषांच्या विचारांचा वारसा जोपासण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

# अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी मोहिम राबविणार- पोलीस अधीक्षक



**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी जिल्हा पोलिस दलाच्या वतीने प्रयत्न केले जात आहेत. बीड जिल्ह्यात सन २०२५-२६ या वर्षात अपघाताच्या संख्या कमी झाली आहे. अपघातात मृत्यू पावणारांची संख्या कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न करून मोहीम राबवून प्रयत्न करणार, असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी म्हटले आहे.**

या संदर्भात बोलतांना जिल्हा पोलिस अधीक्षक काँवत म्हणाले, जिल्हा वाहतूक वाहतूक शाखेमार्फत वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. जिल्ह्यातील अपघातग्रस्त स्थळांची पाहणी करून त्याच्यावर उपाययोजना करण्यासंदर्भात परिवहन विभाग, आणि पोलिसांच्या पथकासह प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे गेल्या वर्षी जिल्ह्यातील अपघाताचे प्रमाण २५ टक्के कमी झाले आहे. यापुढेही अपघातातील मृत्यूचे प्रमाण कमी होण्यासाठी विशेषता आणि खबरदारी घेतली जाईल. जिल्ह्यात नंबर नसलेल्या वाहनाविरुद्ध कठोर मोहीम राबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विशेषताने वाळू वाहतूक करणाऱ्या हायवा विरुद्ध कारवाई करण्यात येणार, असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी म्हटले आहे. गेल्या वर्षी शासन आदेशानुसार नियमानुसार सुमारे ६०० च्या वर बदल्या करण्यात आल्या होत्या यावर्षी बारा वर्ष आणि स्वस्त लोक अशी संख्या खूप कमी असून कमी आहे त्यामुळे सुमारे २०० पोलीस कर्मचाऱ्यांच्या नियमानुसार आणि पारदर्शक करण्यात येतील. जिल्ह्यातील कायदा, सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कार्यक्षम आणि कर्तव्य तत्पर अधिकारी देण्यासंदर्भात प्रयत्न करणार असल्याचे पोलिस अधीक्षक यांनी म्हटले आहे.

# अंबाजोगाईतील डॉक्टरांच्या आत्महत्येचे गूढ उकळले

## महिलेच्या त्रासाला कंटाळून जीव दिला

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**२९ वर्षीय डॉक्टर मंदार उमेश दाभाडे यांच्या मृत्यू प्रकरणात धक्कादायक माहिती समोर आली आहे. बीड जिल्ह्याच्या अंबाजोगाई येथील स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या डॉ. दाभाडेंनी चनई रोड भागातील संत रोहिदास नगर येथे भाड्याने वास्तव्यास असलेल्या घरात गळफास घेतल्याची घटना ६ एप्रिल २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास समोर आली होती. महिला सहकाऱ्याच्या जाचाला कंटाळून त्यांनी आयुष्याची अखेर केल्याची माहिती समोर आली आहे.**

डॉ मंदार दाभाडे आपल्या घराचे दार उघडत नसल्याने शेजाऱ्यांना संशय आला होता. त्यामुळे पोलिसांच्या मदतीने दार उघडण्यात आल्यावर सर्वांना मोठा धक्का बसला. या प्रकरणाचा उलगडा अतिशय फिल्मी पद्धतीने झाला. कारण मृत्यूपूर्वी डॉक्टर दाभाडे यांनी आपल्या भावाच्या मोबाईलवर पाठवलेल्या एका पासवर्डमुळे या प्रकरणातील धक्कादायक वास्तव उघड झालं. एका महिला सहकाऱ्याच्या जाचाला कंटाळून त्यांनी जीव दिल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी भावाने दिलेल्या तक्रारीनंतर अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात संबंधित महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डॉ. मंदार यांनी जीव देण्यापूर्वी भाऊ लौकिक दाभाडे यांना त्यांच्या मोबाईलचा पासवर्ड पाठवला असल्याचा खुलासा करण्यात आला होता. मयत डॉ मंदार दाभाडे यांचे अंत्यविधी आटोपल्यानंतर लौकिक यांनी तो पासवर्ड वापरुन मंदार यांचा मोबाईल उघडला असता, त्यामध्ये एक धक्कादायक सुसाईड नोट आढळून आली. त्यात मंदार यांनी 'सॉरी पप्पा व भैया' असे म्हणत आपल्या वडिलांची आणि भावाची माफी मागितली. स्वतःवर ओढवलेल्या प्रसंगाचे वर्णन केले आहे. डॉ मंदार दाभाडे यांचे एका सहकाऱ्याच्या घटस्फोटित बहिणीसोबत (मूळ रा. छत्रपती संभाजीनगर, ह.मु. रोहिदास नगर, चनई रोड, अंबाजोगाई) ओळख होती. तिने मंदार यांना स्वतःचे आक्षेपार्ह व्हिडिओ आणि चॅट्स पाठवून शरीरसंबंधासाठी प्रवृत्त केले होते. त्यानंतर तिने 'मी गर्भवती असून माझ्याशी लग्न कर, नाहीतर मी विष पिऊन जीव देईन आणि सुसाईड नोटमध्ये तुझं नाव लिहीन' अशी धमकी देत सातत्याने ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली असल्याचे देखील त्या नोट मध्ये लिहिले असल्याचे सांगण्यात आले आहे. या सततच्या मानसिक त्रासामुळे आणि बदनामीच्या भीतीने डॉक्टर मंदार दाभाडे खचून गेले आणि त्यातूनच त्यांनी टोकाचे पाऊल उचलले. या प्रकरणाच्या अनुषंगाने समोर आलेल्या धक्कादायक खुलाशानंतर डॉ मंदार दाभाडे यांचा भाऊ लौकिक दाभाडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून अंबाजोगाई येथील शहर पोलिस ठाण्यातीन पोलिसांनी आरोपी महिलेविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८ नुसार जीव देण्यास प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. या गंभीर प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक ससाणे करत असल्याचे सांगण्यात आले आहे.

पान १ वरून...

### शेतमालाच्या हमीभावावर

की, ''गेल्या पाच वर्षांत केवळ महाराष्ट्रातच १७ हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. हमीभाव अनेकदा उत्पादन खर्चापेक्षा कमी असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागतो. त्यामुळे हमीभाव हा किमान उत्पादन खर्चापेक्षा ५० टक्के अधिक असावा.'' सध्या देशात हमीभाव ठरवताना 'ए२ + एफएल' या सूत्राचा वापर केला जातो. यात ए२ म्हणजे शेतकऱ्याने केलेला प्रत्यक्ष खर्च (बियाणे, खते, मजुरी इ.), तर एफएल म्हणजे कुटुंबीयांच्या श्रमांचा खर्च. या एकूण खर्चाच्या दीडपट (१.५ पट) दराने हमीभाव निश्चित केला जातो. मात्र या पद्धतीत जमिनीचे भाडे, भांडवली गुंतवणूक आणि कर्जावरील व्याज यांचा समावेश नसल्याने शेतकऱ्यांचा वास्तविक खर्च कमी दाखवला जातो, असा युक्तिवाद करण्यात आला. याचिकेत पुढे असेही नमूद करण्यात आले की, सध्या गहू व भात यांसारख्या मर्यादित पिकांचीच मोठ्या प्रमाणावर सरकारी खरेदी होते. त्यामुळे इतर पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांना हमीभावाचा लाभ मिळत नाही. वाढता उत्पादन खर्च आणि अपुरी खरेदी व्यवस्था यामुळे शेतकऱ्यांवर दुहेरी आर्थिक ताण निर्माण होत आहे. त्यामुळे प्रत्येक गाव, शहर आणि जिल्हा स्तरावर पुरेशी शासकीय खरेदी केंद्रे उभारावीत, जेणेकरून शेतकऱ्यांना आपला माल विक्रीसाठी भटकावे लागू नये, अशी मागणीही याचिकाकर्त्यांनी केली आहे. दरम्यान, या सर्व मुद्द्यांवर केंद्र सरकारने आपली स्पष्ट भूमिका मांडावी, अशी नोटीस सर्वोच्च न्यायालयाने बजावली असून, या प्रकरणातील पुढील सुनावणीकडे देशभरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

----------------

### नगर-कल्याण महामार्गावर

होते, त्यापैकी ११ जणांचा जागीच मृत्यू झाल्याची भीती स्थानिकांनी व्यक्त केली. या अपघातात मृतांची नावे आता समोर येत आहेत; ज्यामध्ये प्रशांत चंदने, जिजा गोविंद केंबरे, भूषण घोरपडे, अनंत पवार, दीपक गवळी आणि गणपत जेतू मदे यांचा दुर्दैवी अंत झाला आहे. मृतांमध्ये एकाच कुटुंबातील तीन सदस्यांचा समावेश आहे. तसेच, मुरबाड येथे सर्कल अधिकारी म्हणून कार्यरत असलेले महसूल अधिकारी भूषण घोरपडे यांचाही या अपघातात मृत्यू झाला आहे. अपघाताचा आवाज ऐकताच परिसरातील स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी घटनास्थळी धाव घेतली. चक्काचूर झालेल्या कारमधून मृतदेह बाहेर काढण्याचे काम स्थानिकांनी अत्यंत जड अंतःकरणाने केले. टिटवाळा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून तपास सुरू केला आहे. पोलिसांनी मृतांचा अधिकृत आकडा अद्याप जाहीर केला नसला तरी, ही संख्या वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. हा अपघात नेमका कशामुळे झाला? चालकाचा ताबा सुटला की वेगाचा अतिरेक नडला? हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. टिटवाळा पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. या भीषण अपघातामुळे महामार्गावरील वाहतुकीवरही काही काळ परिणाम झाला होता. एका गंभीर जखमी प्रवाशावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

-----------

### सूरही गहिवरले..! सूरसम्राज्ञी आशा भोसले

तेलुगू अशा विविध भाषांमध्ये हजारो गाणी गायली. आर. डी. बर्मन, ओ. पी. नैय्यर, सचिन देव बर्मन आणि लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्यासोबत त्यांनी दिलेली गाणी आजही रसिकांच्या हृदयात घर करून आहेत. अंत्यसंस्कारावेळी वातावरण अत्यंत शोकाकुल होते. गायक अनुप जलोटा आणि शान यांनी आपल्या सुरांतून श्रद्धांजली वाहत आशाताईंच्या आठवणींना उजाळा दिला. आशा भोसले यांचं जाणं ही केवळ सिनेसृष्टीची नाही, तर संपूर्ण देशाची मोठी हानी मानली जात आहे. त्यांच्या आवाजाचा वारसा मात्र पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

--------------

### महाराष्ट्राला मिळणार २७

उपलब्ध असल्यास निवडणुका घेण्याचा नियम लागू होऊ शकतो. यासाठी निवडणूक आयोगाने संबंधित मतदारांची माहिती मागवली असून लवकरच या १७ जागांसाठी निवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे.याशिवाय, विधानसभेतील सदस्यांमधून निवडून द्यायच्या ९ जागांची मुदत १७ मे रोजी संपत आहे. त्यामुळे या जागांसाठीही लवकरच निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे. सध्याच्या राजकीय समीकरणानुसार महायुतीला बहुसंख्य जागा मिळण्याची शक्यता आहे त्याचबरोबर काँग्रेस नेत्या प्रज्ञा सातव यांनी दिलेल्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या एका जागेसाठी पोटनिवडणूक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे एकूण २७ जागांसाठी निवडणुका होण्याचा अंदाज वर्तवला जात आहे.या सर्व पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने हालचाली वेगात केल्या असून येत्या तीन महिन्यांत राज्याच्या राजकारणात मोठे बदल पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

-----------------

### भाजपकडून मित्रपक्षांची

खासदार फोडणार असल्याच्या बातम्या समोर आल्या, परंतु वस्तुस्थिती मात्र वेगळीच आहे, पुढच्या महिन्याच्या शेवटपर्यंत सत्तेतील मोठ्या पक्षाकडून त्यांच्याच मित्रांची शिकार केली जाणार असल्याची पक्की माहिती आहे. तसेच महाराष्ट्राला काळिमा फासणारे भोंदू खरात प्रकरण हे समोर आलेले नाही, तर ते ठरवून बाहेर आणले गेले आहे. ही फक्त सुरुवात असून पुढील काळात अशा आणखी घटना उघड होण्याची शक्यता नाकारता येत नाही,असा दावाही त्यांनी केला. सत्ताधारी मित्रपक्षांमधील संबंधांवर भाष्य करताना पवार म्हणाले, आज भाजप मित्रपक्षांप्रती 'ए दोस्ती हम नहीं छोड़ेंगे' अशी भावना दाखवत आहे. मात्र उद्या हीच भावना 'जा बेवफा जा हमें'याहून वेगळी असणार नाही हे नक्की आहे. त्यामुळे आपलीच भाजपकडून शिकार होऊ नये यासाठी मित्रपक्षांनी अधिक काळजी घेणे उचित राहील, असा सल्ला त्यांनी सत्ताधारी शिवसेना, राष्ट्रवादीला दिला आहे.

------------

### युद्धाची झळ स्वयंपाकघरापर्यंत,

गेल्या वर्षीच्या तुलनेत कच्च्या पाम तेलाची आयात जवळपास दुप्पट झाली आहे. मार्च २०२५ मधील ३.४३ लाख टनांच्या तुलनेत गेल्या महिन्यात ६.७३ लाख टन कच्च्या पाम तेलाची आयात करण्यात आली. तथापि, मार्च २०२६ च्या एकूण आयातीचा विचार करता फेब्रुवारी महिन्याच्या तुलनेत यात १० टक्क्यांची घट झाली आहे. फेब्रुवारीमध्ये १२.९२ लाख टन तेलाची आयात झाली होती. जागतिक बाजारातील वाढते दर, रुपयाचे घसरलेले मूल्य आणि देशांतर्गत मोहरीच्या पिकाची चांगली उपलब्धता यामुळे गेल्या महिन्याच्या तुलनेत आयातीत काहीशी घट झाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. भारताच्या एकूण वनस्पती तेल आयातीवर नजर टाकल्यास, मार्च महिन्यात ही आयात ११ टक्क्यांनी वाढून ११.८६ लाख टनांवर पोहोचली आहे. चालू विपणन वर्षाच्या (नोव्हेंबर-ऑक्टोबर) पहिल्या पाच महिन्यांत म्हणजेच नोव्हेंबर २०२५ ते मार्च २०२६ दरम्यान एकूण आयात ८ टक्क्यांनी वाढून ६५.७२ लाख टनांवर गेली आहे. भारत प्रामुख्याने इंडोनेशिया आणि मलेशियाकडून पाम तेल, तर अर्जेंटिना आणि ब्राझीलकडून सोयाबीन तेलाची आयात करतो. देशांतर्गत गरजेच्या निम्म्याहून अधिक वाटा हा आजही आयातीवर अवलंबून आहे. पश्चिम आशियातील सुरू असलेला संघर्ष आणि रशिया-युक्रेन युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती कडाडल्या असून मालवाहतुकीचा खर्चही (फ्रेट कॉस्ट) वाढला आहे. यामुळेच डिसेंबर ते फेब्रुवारी दरम्यान भारतीय आयातदारांनी मोठ्या प्रमाणावर साठा करून ठेवला होता. मात्र, आता जागतिक परिस्थिती आणि जैवइंधनासाठी तेलाचा वाढता वापर पाहता, आगामी काही महिन्यांत खाद्यतेलाची आयात काहीशी मंदावण्याची शक्यता आहे. सीच्या मते, जोपर्यंत जागतिक किमती स्थिर होत नाहीत, तोपर्यंत भारतीय रिफायनर्स वेट अँड वॉच धोरण अवलंबण्याची चिन्हे आहेत.

------------------

### मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता

तीन वर्षांचे लेखापरीक्षण पूर्ण असणे आवश्यक ठेवण्यात आले आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेत शेळी/मेंढी/गाय/म्हैस/कुक्कुटपालन यांचा समावेश आहे. आता या निर्णयानुसार वराह पालनाला चालना देण्यासाठी 'वराह पालन गट वाटप योजना' समाविष्ट करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत ५+१ वराह गट, विमा आणि आवश्यक पायाभूत सुविधा यांचा समावेश असलेला सुमारे २.०८ लाख रुपयांचा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. सर्वसाधारण लाभार्थ्यांना ५० टक्के तर अनुसूचित जाती-जमातींना ७५ टक्के अनुदान देण्यात येणार आहे. या योजनेत सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील भूमिहीन, अल्पभूधारक, महिला बचत गट आणि सुशिक्षित बेरोजगारांना प्राधान्य देण्यात येणार असून महिलांसाठी ५० टक्के तर दिव्यांगांसाठी ५ टक्के आरक्षण लागू राहणार आहे. लाभार्थ्यांना पशुपालनाचे प्रशिक्षण घेणे अनिवार्य करण्यात आले असून स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली खरेदी प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. उद्योजकता विकास योजनेअंतर्गत ४ टक्के व्याज सवलत योजना ही शेळी/मेंढी/गाय/म्हैस/कुक्कुटपालन या पशुपालन व्यवसायाबरोबरच वराह पालन व्यवसायालाही लागू करण्यात आली आहे. यामुळे पशुपालन क्षेत्रात गुंतवणूक वाढून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळण्याची अपेक्षा मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली आहे.

------------------


# टिप्परच्या धडकेने एकाचा मृत्यू

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई तालुक्यातील शिरसदेवी येथे गढी- माजलगाव रस्त्यावर टिप्परच्या धडकेने एकाचा मृत्यू झाला. ही घटना सोमवारी दुपारी पाचच्या सुमारास घडली. तलवाडा पोलिसांनी हा टिप्पर ताब्यात घेतला असून टिप्पर चालकालाही ताब्यात घेतले आहे. हा टिप्पर शिंदे नावाच्या व्यक्तीचा असल्याचे समजते.**

गेवराई तालुक्यातील गढी- माजलगाव रस्त्यावर असलेल्या सिरसदेवी फाट्यावर भागवत कांबळे या व्यक्तीचे चप्पल चे दुकान आहे. तो रस्त्यावरुन जात असतांना पाठीमागून येणाऱ्या टिप्परने त्याला धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. याची माहिती मिळताच तलवाडा पोलिसांनी तात्काळ धाव घेऊन हा टिप्पर ताब्यात घेतला.टिप्पर चालकालाही ताब्यात घेण्यात आले असून भागवत कांबळे यांचे शवविच्छेदन तलवाडा येथे करण्यात आले. हा मुरमाचा टिप्पर शिंदे नावाच्या व्यक्तीचा असल्याचे समजते. याप्रकरणी तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती.

## थोडक्यात



नवगण राजुरी : क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना उपसरपंच भगवान बहीर, सुरेश बनकर, मारुती वाघ, अनिल बनकर, लहू लगड, रामचंद्र बहीर, ज्ञानेश्वर बहीर आदी.

### मॅपिंग करून घ्या नसता मतदार यादीतून कायमचे नाव वगळले जाणार – प्रा. आंधळे

बीड । प्रतिनिधी



दिनांक १३ ४ २०२६ बीड जिल्ह्यातील सर्व मतदाराचे मतदार पुनर्नरीक्षण आणि मॅपिंग करण्यासाठी सर्व मतदान केंद्रावर रविवार आणि सोमवार अशा दोन दिवशीय विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे या मोहिमेचा लाभ बीड जिल्ह्यातील सर्व समाजातील नागरिकांनी घ्यावा असे आवाहन ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केले आहे निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार जर मतदारांनी आपले मॅपिंग करून घेतले नाही तर त्यांचे नाव मतदार यादीतून कायमचे वगळले जाण्याची शक्यता आहे नाव वगळले गेल्यास भविष्यात सर्व सवलतीपासून वंचित राहावे लागू शकते म्हणून बीड जिल्ह्यातील सर्व मतदार बंधू आणि भगिनींनी आपले मॅपिंग करून घ्यावे असे आवाहन एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केले आहे.

### किरण नरवडे सलग दुसऱ्या वर्षी कॉलेजमध्ये पहिली

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्याची हुशार आणि जिद्दी कन्या किरण नरवडे हिने पुन्हा एकदा यशाचा झेंडा रोवला आहे. महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक अंतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेत तिने ७६.०४% गुण मिळवत आपल्या कॉलेजमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे, किरणने सलग दुसऱ्या वर्षीही हे यश संपादन करत आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.



गेल्या वर्षी प्रथम क्रमांक मिळवून सर्वांचे लक्ष वेधून घेतलेल्या किरणने यंदाही तीच परंपरा कायम ठेवली आहे. कोल्हापूर व सांगलीसारख्या शैक्षणिकदृष्ट्या पुढारलेल्या भागांतील विद्यार्थ्यांशी स्पर्धा करत बीड जिल्ह्यातील माजलगावची ही लेक अव्वल ठरली, ही बाब विशेष उल्लेखनीय ठरत आहे.

किरणच्या या उज्ज्वल कामगिरीमुळे बीड जिल्हा आणि माजलगाव तालुक्याचा मान उंचावला असून, सर्व स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शिक्षकवृंद, मित्रपरिवार आणि नरवडे कुटुंबीयांनी तिच्या यशाचा अभिमान व्यक्त करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.अत्यंत साध्या पार्श्वभूमीतून आलेल्या किरणने मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश मिळवले आहे. तिच्या या कामगिरीमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ती एक प्रेरणास्थान ठरली आहे. किरण नरवडेच्या या घवघवीत यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण असून, तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भविष्यातही ती असेच यश संपादन करून माजलगावचे नाव उज्ज्वल करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# स्वयंपाकघरातील मसाल्यांत दडलंय आरोग्याचं गुपित

### आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे वनस्पती शिबिर उत्साहात, ३६० नागरिकांनी घेतला लाभ; ८० पेक्षा जास्त औषधी द्रव्यांचे प्रदर्शन

बीड । प्रतिनिधी

आपल्या स्वयंपाकघरात रोज वापरले जाणारे जिरे, धने, मिरे आणि हिंग हे केवळ चव वाढवणारे पदार्थ नसून ते आरोग्याचे रक्षक आहेत, हा संदेश आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाच्या वतीने आयोजित शिबिरातून देण्यात आला. आदित्य शिक्षण संस्थेचे संस्थापक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय माध्यमिक विद्यालय, सारडा पार्क येथे शनिवार दि. ११ एप्रिल रोजी स्वयंपाकघरातील औषधी वनस्पती या विषयावर भव्य शिबिर पार पडले. या प्रदर्शनाचा बीडमधील ३६० नागरिकांनी लाभ घेतला. ८० पेक्षा जास्त औषधी द्रव्यांचे प्रदर्शन विद्यार्थ्यांनी भरवले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा तर प्रमुख पाहुणे म्हणून अन्न सुरक्षा अधिकारी अजय गाढे, अंकुश नरवाडे आणि सिद्धार्थ चव्हाण हे उपस्थित होते. त्यांनी अन्न सुरक्षा आणि औषधी वनस्पतींचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य, शाळेच्या मुख्याध्यापिका आणि संस्थेच्या विविध विभागांचे प्राचार्य उपस्थित होते.



अंकुश नरवाडे (अन्न सुरक्षा अधिकारी) यांनी बोलताना सांगितले कि,केवळ आजारी पडल्यावर उपचार करण्यापेक्षा, स्वयंपाकघरातील वनस्पतींचा वापर करून आरोग्य कसे टिकवावे, हे या शिबिराने शिकवले आहे, असे अन्न सुरक्षा अधिकारी सिद्धार्थ चव्हाण म्हणाले. आदित्य शिक्षण संस्थेने अशा सामाजिक उपक्रमातून सर्वसामान्य नागरिकांशी जोडलेली नाळ ही शहराच्या आरोग्यासाठी अत्यंत आश्वासक आहे.

केवळ आजारी पडल्यावर उपचार करण्यापेक्षा, स्वयंपाकघरातील वनस्पतींचा वापर करून आरोग्य कसे टिकवावे, हे या शिबिराने शिकवले आहे, असे अन्न सुरक्षा अधिकारी सिद्धार्थ चव्हाण म्हणाले. आदित्य शिक्षण संस्थेने अशा सामाजिक उपक्रमातून सर्वसामान्य नागरिकांशी जोडलेली नाळ ही शहराच्या आरोग्यासाठी अत्यंत आश्वासक असल्याचे सिद्धार्थ चव्हाण (अन्न सुरक्षा अधिकारी) यांनी यावेळी नमूद केले.

विद्यार्थ्यांचा सहभाग आणि जनजागृती

या प्रदर्शनास सुमारे ३६० नागरिकांनी भेट देऊन आरोग्याविषयीची शंकांचे निरसन करून घेतले. महाविद्यालयातील २०० विद्यार्थ्यांनी या शिबिराचे नियोजन आणि माहिती देण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवला. या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता, प्रत्यक्ष लोकसंवाद साधल्यामुळे व्यवहारी ज्ञानाचाही अनुभव आला. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली, द्रव्यगुण विभागाच्या प्राध्यापिका डॉ. मयुरी शिंदे-करंडे, प्रा. रामेश्वर ढेबळे आणि इतर शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले.

या उपक्रमामुळे बीड शहरात घरगुती औषधी वनस्पतींबाबत मोठी जागरूकता निर्माण झाली असून, आयुर्वेदाचा वारसा घराघरात पोहोचवण्यास मदत झाली आहे.

# जिजामाता फिजिओथेरपी महाविद्यालयात ‘क्रीडा सप्ताहा’चा जल्लोष

माजलगाव । प्रतिनिधी

येथील जिजामाता फिजिओथेरपी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक क्रीडा महोत्सवाने विद्यार्थ्यांच्या उत्साहाला अक्षरशः उधाण आले. ‘द्वितीय वार्षिक क्रीडा दिना’निमित्त विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून संपूर्ण परिसर खेळाच्या उत्साहाने भारावून गेला होता. क्रिकेट, व्हॉलीबॉल, थ्रो बॉल, बुद्धिबळ, कॅरम, बॅडमिंटन अशा विविध स्पर्धांमुळे महोत्सवाला विशेष रंगत आली. खेळाडूंच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आणि प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या कडकडाटामुळे वातावरण उत्साहपूर्ण झाले होते.

सविस्तर वृत्त असे की, या क्रीडा महोत्सवातील क्रिकेट स्पर्धेने विशेष आकर्षण ठरवले. अंतिम सामन्यात तृतीय वर्षाच्या ‘डॉमिनेटर्स’ संघाने प्रथम वर्षाच्या ‘रॉयल’ संघावर ८ गडी राखून दणदणीत विजय मिळवत विजेतेपद पटकावले. प्रथम फलंदाजी करताना





रॉयल संघाने १० षटकांत ४९ धावांचे आव्हान उभे केले. त्यांच्या सलामीवीराने चांगली फलंदाजी केली असली तरी तृतीय वर्षाच्या गोलंदाजांनी अचूक मारा करत धावसंख्येवर नियंत्रण मिळवले. प्रत्युत्तरात डॉमिनेटर्स संघाने आक्रमक फलंदाजी करत चौकार-षटकारांची बरसात केली आणि अवघ्या सहा षटकांत विजय संपादन केला. अविले प्रथमेश याने ४ गडी बाद करत सामन्याचा ‘सामनावीर’ ठरला.इतर स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. मुलांच्या क्रिकेटमध्ये डॉमिनेटर्स संघ विजयी ठरला, तर मुलींच्या क्रिकेटमध्ये रॉयल संघाने बाजी मारली. व्हॉलीबॉलमध्ये थंडर संघाने, थ्रो बॉलमध्ये तनवीर पठाण हिने, बुद्धिबळ स्पर्धेत रोहित शेटे व किरण लिंगाळे यांनी, कॅरममध्ये अरमान मुर्शद व सानिका वाघमारे यांनी, तर बॅडमिंटनमध्ये शिवानी सोसे, अलिशा शेख तसेच अरमान मुर्शद व मनोज गर्डे यांनी यश संपादन केले. प्रत्येक स्पर्धेत खेळाडूंनी दाखवलेली जिद्द, चिकाटी आणि क्रीडाभावना विशेष उल्लेखनीय ठरली.

या प्रसंगी सिंदफणा पब्लिक स्कूलचे क्रीडा विभाग प्रमुख दीपक माने सर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पॉल राज सर तसेच जिजामाता नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य विनोद कुमार सर यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणातून ‘‘अभ्यासाबरोबरच शारीरिक तंदुरुस्ती आणि खेळांची सवय ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक आहे,’’ असा मौलिक संदेश दिला. यावेळी कार्यालय अधीक्षक वाघ सर, शिंदे सर, इरफान पठाण सर तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.एकूणच, या क्रीडा महोत्सवामुळे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, शिस्त, आत्मविश्वास आणि क्रीडावृत्ती यांचा विकास झाला असून महाविद्यालयाच्या क्रीडा परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. उत्साह, आनंद आणि खेळाडूवृत्तीने परिपूर्ण असा हा ‘क्रीडा सप्ताह’ सर्वांच्या स्मरणात दीर्घकाळ राहणारा ठरला.

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाची

शिक्षण व सार्वजनिक सेवा,केंद्र व राज्य सरकारला लागू आहे.जातीनिहाय महामंडळे असताना अतिमागास यांना न्याय मिळाला नाही तर उपवर्गीकरणाने न्याय कसा मिळेल?महत्वाचा मुद्दा असा की सर्व क्षेत्रातील प्रतिनिधित्व ठरविण्यासाठी अनुसुचित जातीच्या महार व धर्मांतरित बौद्ध यांची एकत्रित लोकसंख्या विचारत घ्यावी.अनुसूचित जातीच्या महार समाजाने संविधान निर्माते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन बुद्धाचा विचार स्वीकारला,बौद्ध झाले,उच्चशिक्षण घेतले आणि प्रगती केली.या द्वेषामुळे उपवर्गीकरण जलद गतीने होत आहे असे दिसून येते. त्यामुळे एकंदरीत सर्व बाबींचा विचार करता ही प्रक्रियाच तात्काळ थांबवावी अशी आग्रही मागणी कास्ट्राईब कडून करण्यात आली आहे.

### ‘केजच्या ‘प्रायव्हेट लिमिटेड

न येणे, विशिष्ट लोकांना भेटणे, ग्रामीण भागात दुर्लक्ष, मर्जीतले लोकांना व इतर पक्षातील लोकांना निधी देणे या मुळे खऱ्या कार्यकर्त्यांची वाताहात होत असल्यामुळे कार्यकरते दरबारी पदाधिकारी यांना भालदार व चोपदार, उंदीर, नंदी, पिंडीवरचा इच्चू, गणपती, , शंकर -पार्वती असे नावे कार्यकर्ते खाजगीत प्रायव्हेट लिमिटेड काँग्रेस बद्दल बोलेत आहेत, बीड जिल्ह्यात राहुल सोनवणे बीजेपीच्या पाटलांच्या मांडीवर बसून काँग्रेसच्या पाटलाच्या लेकराचा पाळणा प्रतिमत्मक रित्या गेली १५ वर्ष हलवून निष्क्रियतेच्या मंदझोपीच्या गोळ्या खाऊ घालत आहे, व स्वतहाचा स्वर्थ साधत आहे, कारखाना कर्मचारी, संस्थेमधील कर्मचारी, राज्यसभा निधी, घर म्हणून कार्यालय अनेक गोष्टी सोई नुसार वापर करतात, अनेक वेळा वरिष्ठांकडे तक्रारी करूनही राजा राणी दुर्लक्ष करत राहिले, या धोरणामुळे कार्यकर्ते व पक्ष निष्क्रिय झाले असून काहींनी पक्षापासून अंतर ठेवले आहे.

‘‘सुजन अभियान’’ दरम्यान जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कार्यकर्त्यांच्या प्रश्नांना निरीक्षक नितु वर्मा यांना सामोरे जावं लागले, प्रचंड नाराजी निरीक्षकांसमोरच उघड झाली. राज्यसभेचा निधी, कोट्यवधी रुपयांची गुत्तेदारी आणि विविध यंत्रणा हातात असूनही एक साधा कार्यकर्ता देखील एकत्र करता न येणे, ही अत्यंत लाजिरवाणी बाब असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. ‘‘दिल्लीमध्ये नेतृत्व करणारे स्थानिक पातळीवर मात्र शून्य का?’’ असा प्रश्नही कार्यकर्त्यांकडून उपस्थित करण्यात आला.

केवळ केज तालुकाच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्यात अशीच परिस्थिती निर्माण होत असून, राष्ट्रीय स्तरावर वेळेत ठोस आणि पारदर्शक निर्णय न घेतल्यास काँग्रेस पक्षासमोर मोठे संघटनात्मक संकट उभे राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. पक्ष जर दरबारी राजकार्यांच्या मनावर चालणार असेल, दिल्लीतील वजन आणी ओळखीवर निर्णय घेणार असेल तर असल्या प्रोसेस का करता, या वेळी जर असंच प्रकार झालं तर कर्तकर्त्यांचा राहुल गांधी व सर्व पक्ष सिस्टीम वरील विश्वास प्रक्रियेवर विश्वास ठेवणार नाही, कार्यरते फिरकणार नाहीत, मंडल्यानंतर कार्यकर्त्यांनी प्रामाणिक विनंती केली,ही वास्तव स्थिती निरक्षक यांनी दिल्ली येथे कळवणार असलायचे आश्वासन दिलें आहे..

### गाडगेबाबांच्या विचारांची

पिसाळ, मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे, पर्यावरणप्रेमी अभिमान खरसाडे, संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष गणेश मस्के, लेक लाडकी अभियानाचे समन्वयक बाजीराव ढाकणे, मराठा सेवा संघाचे अध्यक्ष प्रा. पंजाब येडे तसेच अनेक पदाधिकारी, शिक्षक व प्राध्यापकांनी यावेळी आपापल्या भावना व्यक्त केल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार संयोजक ह.भ.प. संतोष महाराज डोंगरे यांनी मानले, तर संचालन ह.भ.प. श्रीकृष्ण महाराज उबाळे यांनी केले. या प्रसंगी सामाजिक कार्यकर्त्यांनी महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा जपत समाजप्रबोधनाची गरज अधोरेखित केली.

### मुस्लिम आरक्षण मोर्चात

मागणी आहे. समाजातील अनेक तरुण आजही संधीअभावी मागे राहत आहेत. त्यामुळे आपल्या मुला-बाळांच्या जीवन उज्ज्वल भविष्यासाठी हा लढा आवश्यक आहे. ते पुढे म्हणाले की, सर्व काग्रेस विचार धारेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी मुस्लिम समाजा सोबत एकजुटीने उभे राहिला पाहिजे असे काग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल शाहुराव जाधव यांनी सांगितले आहे.

### अ.भा.मराठी पत्रकार परिषदेचे

राहूल लोंढे, जयेश वाणी हे विविध राजकीय पक्षांचे प्रवक्ते सहभागी होतील.. पत्रकारांची बाजू मांडतील ज्येष्ठ पत्रकार जतीन देसाई.दुपारी १.३० ते ३ या वेळेत टीव्हीच्या पडद्यावरची दुनिया या विषयावरील चर्चेत प्रसन्न जोशी, विशाल परदेशी, प्रज्ञा पोवळे, श्वेता दांडेकर, सौरभकोरटकर, विशाल पाटील सहभागी होतील.दुपारी ३ ते ५ या वेळात अधिवेशनाचा समारोप समारंभ होईल.जय महाराष्ट्रचे संपादक प्रसाद काथे आणि मुक्तपीठचे संपादक तुळशीदास भोईटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. एस.एम.देशमुख कार्यक्रमाचे अध्यक्ष असतील.समारोप समारंभात लातूर जिल्ह्यातील काही मान्यवर पत्रकारांचा सत्कार करण्यात येणार आहे. या अधिवेशनाला बीड जिल्ह्यातून पत्रकारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संभाजीनगर विभागाचे सचिव रवी उबाळे, समन्वयक सुभाष चौरे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे, जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार, कोषाध्यक्ष धनंजय अरबुने, हल्ला विरोधी कृषी समितीचे जिल्हा निमंत्रक दत्ता आंबेकर, समन्वयक अभिमन्यू घरत आदींनी केले आहे.

# भगवंताच्या प्रेमात रंगतो, तेव्हा संसारातील माया, मोह आणि धनाची आस आपोआप नाहीशी होते- महंत योगीराज स्वामी महाराज

बीड । प्रतिनिधी

भक्ती ही केवळ बोलण्याची किंवा प्रदर्शनाची गोष्ट नसून ती अनुभवण्याची गोष्ट आहे. जेव्हा भक्त भगवंताच्या प्रेमात रंगून जातो, तेव्हा संसारातील माया, मोह आणि धनाची आसक्ती आपोआप नाहीशी होते, असे प्रतिपादन श्री क्षेत्र रामगडाचे महंत ह.भ.प. श्री योगीराज स्वामी महाराज यांनी केले. श्री क्षेत्र संस्थान रामगडच्या वतीने शिदोड येथे आयोजित नारळी अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता समारंभात ‘काल्याच्या कीर्तनाप्रसंगी’ ते बोलत होते. या वेळी संपूर्ण परिसर हरिनामाच्या गजराने आणि भक्तीमय वातावरणाने भारावून गेला होता.

श्री क्षेत्र रायगडाच्या वतीने ४७ वा नारळी सप्ताह बीड तालुक्यातील शिदोड नगरीत मध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

हरीनें माझें हरीलें चित्त । भार वित्त विसरलें ।।१।।
आतां कैसी जाऊं घरा । नव्हे बरा लौकिक ।।ध्रु.।।
पारखियांसी सांगतां गोटी । घरची कुटी खातील ।।२।।
तुका म्हणे निवांत राहीं । पाहिलें पाहीं परतुनी ।।३।।

या अभंगावर निरूपण करताना श्री महंत श्री हभप योगीराज स्वामी महाराज म्हणाले की, साधक भक्त हरीनामात दंग झाले की घर दार संसार विसरुन जातात. जशा गोकुळातील गौळणी म्हणतात की, भगवंताने माझे चित्त हरण केले, म्हणजे चोरले. त्यामुळे पैसा म्हणजे धन व संसारींक बोजा म्हणजे भार आम्ही विसरुन गेलो आणि आता विसरुन गेल्या मुळे घर च लक्षात न राहील्या मुळे घरी कशी जाऊ ...आता मला लोक काय म्हणतील... लौकीका साठी हे बरे नाही

आणखी तेच मनावर धरुन लोकाबरोबर म्हणजे पारखीयां ना सांगत बसले किंवा गोष्टी करत बसले, तर हातात आलेला देव किंवा परमार्थ निघुन जाईल.



तुकाराम महाराज म्हणतात एकदा मन परमेशवरात लीन झाले तर आपण कुठे जरी असलो तरी पाहीलेले पाहिले की मन परत येते म्हणुन निवांत राहा.

तुकाराम महाराजांच्या अभंगातून आध्यात्मिक उलगडा कीर्तनादरम्यान संत तुकाराम महाराज यांच्याहरीनें माझें हरीलें चित्त, भार वित्त विसरलें...

या अभंगावर महाराजांनी प्रभावी आणि रसाळ निरूपण केले. यावेळी बोलताना महंत श्री योगीराज स्वामी महाराज यांनी भगवंताच्या नामस्मरणात रममाण झालेल्या भक्ताला लौकिक व्यवहाराचे भान राहत नाही. आतां कैसी जाऊं घरा, नव्हे बरा लौकिक या ओळींचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, भक्तीमुळे जीवनाला खरा आनंद आणि समाधान प्राप्त होते असे सांगितले. यावेळी पुढे बोलताना योगीराज महाराजांनी कीर्तनातून केवळ अध्यात्मच नव्हे, तर विविध सामाजिक विषयांवरही मार्गदर्शन केले.आजचा समाज व्यसनाधीनतेच्या विळख्यात अडकत चालला आहे. संतांचे विचार केवळ ऐकण्यासाठी नसून ते आचरणात आणण्यासाठी आहेत, या जिवघेण्या व्यसनाधीनतेच्या विळख्यातून समाजाला आणि तरुणाला बाहेर काढण्याची ताकद केवळ संतांमध्ये आहे हे अनेक उदाहरणातून समाजाला पटवून देत

त्यांनी व्यसनमुक्त समाज घडवण्याचे आवाहन केले.श्रद्धा असावी पण अंधश्रद्धा नसावी, असा महत्त्वपूर्ण संदेश देत विवेकपूर्ण भक्तीचे महत्त्व पटवून दिले. शिक्षण, शेती आणि संस्कारांचे महत्त्व समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.शेतकरी जगला पाहिजे, तरच देश जगेल, असे सांगत त्यांनी शेतीचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच गोसंवर्धन, पर्यावरण संवर्धन आणि स्त्री सन्मान याबाबतही त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

दिग्गज कीर्तनकारांची मांदियाळी

सप्ताहादरम्यान विविध नामवंत कीर्तनकारांनी ज्ञानयज्ञ रंगवला. महंत जनार्दन महाराज, शिवा महाराज बास्कर, निवृत्ती महाराज इंदुरीकर, ज्ञानेश्वर महाराज तांबे, संजय महाराज पाचपोर, जयवंत महाराज बोधले, पुरुषोत्तम महाराज पाटील यांच्यासह अनेकांनी हरिनामाचा जागर केला.ह.भ.प. अंकुर महाराज साखरे यांच्या ‘संगीत रामकथे’ने भाविकांना मंत्रमुग्ध केले.

मान्यवरांची उपस्थिती, ग्रामस्थांचे मोलाचे योगदान

या सोहळ्यासाठी गेवराई विधानसभेचे सदस्य आ.विजयसिंह पंडित, बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांचे चिरंजीव सौरभ सोनवणे, माजी मंत्री बदामराव आबा पंडित, शिवसेनेचे कुंडलिक बापू खांडे, शामराव अण्णा पडुळे यांच्या सूनबाई पूजाताई पडुळे, माजी जि.प.सदस्य दिलीप गोरे, शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह इतर राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली. शिदोडसह परिसरातील हजारो भाविकांनी या सप्ताहात सहभाग घेतला.



### मोठेवाडीत स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील जिजाऊ ज्ञानतीर्थ कोचिंग क्लासेसच्या महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षेत (एम.टी.एस.) ४९ पैकी ४४ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

या यशाबद्दल सोमवारी गुणवंत विद्यार्थ्यांचा गोल्ड मेडल व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक अनिल पास्टे यांनी केले तर श्री. हभप शिवदास महाराज जंगले व संभाजी पास्टे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थी,माता पालकांची मोठी उपस्थिती होती.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-२९० दिनांक-२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती परमेश्वर बबनराव खराद रा.डोमलगाव ता.अंबड जि.जालना यांनी यांच्या स्वतः च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| | परमेश्वर बबनराव खराद | स्वत: | १०/०९/१९७४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-२६४ दिनांक-२७-०३-२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती सिताराम नारायण कापसे रा.डोमलगाव ता.अंबड जि.जालना यांनी यांच्या मुलाच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| | जयतुन सिताराम कापसे | मुलगा | १०/०७/२००९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस; भारतीय हवामान विभागाकडून पहिला अंदाज जाहीर

पुणे ;: भारतीय हवामान विभागाकडून आज नैऋत्य मान्सून २०२६ चा पहिला अधिकृत अंदाज जाहीर केला आहे. यावर्षी देशात सरासरीच्या ९२ टक्के पर्जन्य अंदाज जाहीर करण्यात आला आहे. सामान्य पेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आहे. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. एम रविचंद्रन यांनी यावर्षीच्या मान्सूनचा पहिला अंदाज जाहीर केला आहे.

आज पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. एम. रविचंद्रन आणि हवामान विभागाचे महासंचालक डॉ. एम. मोहापात्रा यांच्या उपस्थित नवी दिल्लीत आज पत्रकार परिषद पार पडली. यामध्ये नैऋत्य मान्सून २०२६ चा पहिला अधिकृत अंदाज जाहीर केला आहे. यामध्ये सामान्य पेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. जेव्हा पावसाचे प्रमाण ९० टक्के ते ९५ टक्के असते त्यावेळी सामान्य पेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात येतो. दरम्यान, संपूर्ण देशभरात दीर्घावधी सरासरी ८७ सेंटीमीटर राहण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे.भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉ. एम. मोहापात्रा यांच्या माहितीनुसार, जून जुलै ऑगस्ट पर्यंत पावसाची स्थिती सामान्य राहणार आहे. जुलै ऑगस्ट सप्टेंबर



महिन्यात एल निनो परिस्थिती असणार आहे. तर जुलै ऑगस्ट सप्टेंबर मध्ये भारतीय समुद्रात सकारात्मक परिस्थिती असल्याची माहिती डॉ. एम. मोहापात्रा यांनी दिली आहे. त्यामुळं एल निनो च्या नकारात्मक परिणामाला भारतीय समुद्रातील सकारात्मक परिस्थिती अनुकूल करेल. त्यामुळं एल निनोचा परिणाम जाणवणार नाही असे डॉ. एम. मोहापात्रा यांनी सांगितले आहे. भारतीय हवामान विभागाने पाऊस मोजण्याच्या पाच श्रेणी ठरवल्या आहेत. सरासरीच्या ९० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस म्हणजे अपुरा पाऊस समजला जातो. दुसऱ्या श्रेणीत ९० ते ९५ टक्के म्हणजे सरासरीपेक्षा कमी पाऊस, तर तिसऱ्या श्रेणीत ९६ ते १०४ टक्के म्हणजे सामान्य सरासरी इतका पाऊस समजला जातो. पुढील दोन श्रेणी सरासरीपेक्षा अधिक म्हणजे १०५ ते ११० टक्के आणि ११० टक्क्यांच्या पुढे अधिक पाऊस म्हणजे सर्वाधिक पाऊस समजला जातो.सरासरीच्या ९० ते ९५ टक्के पाऊस पडणार

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची देखील चिंता वाढणार आहे. कारण भारतीय हवामान विभागानं आज नैऋत्य मान्सून २०२६ चा पहिला अधिकृत अंदाज जाहीर केला आहे. यामध्ये महाराष्ट्रात सामान्यपैक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. कोकण मध्य महाराष्ट्र विदर्भ सगळीकडे सामन्यापेक्षा कमी पाऊस पडणार आहे. म्हणजे सरासरीच्या ९० ते ९५ टक्के पाऊस पडणार असल्याची माहिती हवामान विभागाचे महासंचालक डॉ. एम. मोहापात्रा यांनी दिली आहे.

शेतकऱ्यांची चिंता वाढणार

काही खाजगी वेधशाळांनी यंदा मान्सून सरासरीपेक्षा कमकुवत राहण्याची शक्यता वर्तवली होती. या पार्श्वभूमीवर, अधिकृत सरकारी यंत्रणा म्हणजे भारतीय हवामान विभाग काय अंदाज मांडणार याकडे देशातील बळीराजा आणि सर्वसामान्यांचे डोळे लागले होते. अखेर आज भारतीय हवामान विभागानं मान्सून २०२६ चा पहिला अधिकृत अंदाज जाहीर केला आहे. यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस राहणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळं शेतकऱ्यांची चिंता वाढणार आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हा अंदाज अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

## मक्याच्या संकरीत जाती देतात हेक्टरी १०० क्विंटलपेक्षा अधिक उत्पादन



भारतीय कृषी संशोधन संस्थेने मक्याच्या अशा दोन जाती विकसित केल्या आहेत ज्या बंपर उत्पादन देतात आणि शेतकऱ्यांना यातून चांगले उत्पन्न मिळेल. अलीकडच्या काळात, सीव्हीआरसी (केंद्रीय विविधता प्रकाशन समिती) मार्फत आयआयएमआरकडून मक्याच्या २५ सिंगल क्रॉस हायब्रीड विकसित आणि प्रसारित करण्यात आलेल्या आहेत. मक्याचे हे नवीन वाण आहे डीएमआरएच १३०८ आणि डीएमआरएच १३०१. मक्याच्या या जातींनी राष्ट्रीय स्तरावर उत्पादकता वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आयआयएमआर इथेनॉल उत्पादन वाढवण्यासाठी मका उत्पादन वाढविणाऱ्या प्रकल्पावर काम करत आहे. शेतकऱ्यांनी जास्त उत्पादन देणाऱ्या मक्याच्या वाणांची लागवड करावी यासाठी प्रयत्न सुरु आहेत. मक्याच्या माध्यमातून शेतकरी ऊर्जा उत्पादक बनले पाहिजे.

डीएमआरएच १३०८ : रब्बी हंगामात लागवडीसाठी संकरित डीएमआरएच १३०८ ची शिफारस करण्यात आली आहे. १३०-१५० दिवसांत पक्व होणारा हा उच्च उत्पन्न देणारा रब्बी संकरित मका आहे, ज्यामध्ये दाण्यांचा रंग आकर्षक पिवळा आहे, करपा आणि खोड कुजव्या रोगास मध्यम प्रतिकारक आहे. गेल्या चार वर्षात, डीएमआरएच १३०८ मक्याच्या वाणाने मोठा वाटा उचलला आहे.

डीएमआरएच १३०१ : ही जात पूर्व उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, राजस्थान, गुजरात, छत्तीसगड आणि मध्य प्रदेशमध्ये रब्बी हंगामाच्या लागवडीसाठी शिफारस करण्यात आली होती. हा आणखी एक मध्यम कालावधीचा संकरित मका आहे. आकर्षक पिवळे दाणे, करपा आणि खोड कुजव्या रोगास मध्यम प्रतिकारक असलेली ही उच्च उत्पन्न देणारी जात आहे. हा संकरीत वाण शेतकऱ्यांना ६.५ ते १०.५ टन/हेक्टर उत्पादन देते. म्हणजेच, योग्य व्यवस्थापन केल्यास या जातीपासूनही १०० क्विंटल प्रति हेक्टरपेक्षा जास्त उत्पादन मिळू शकते.

## पोल्ट्री फार्मिंग म्हणजे काय; सुरुवात कशी करावी?

परसातील कुक्कुटपालन तुम्ही तुमच्या घराच्या अंगणात किंवा घराच्या मागे असलेल्या मोकळ्या जागेत सहज करू शकता. यामुळे तुम्हाला काही देशी कोंबडीच्या जाती निवडाव्या लागतील. जेणेकरून तुमचे उत्पन्न वाढेल. देशी कोंबड्या किडे, हिरवा चारा, घरी सोललेली फळे आणि भाजीपाल्याची साले, तणांमधील धान्ये खाऊन जगू शकतात.

तुम्ही कमी खर्चात आणि कमी वेळेत तुमचा स्वतःचा फायदेशीर व्यवसाय सुरू करण्याचा विचार करत असाल तर कुक्कुटपालन व्यवसाय तुमच्यासाठी खूप चांगला पर्याय असू शकतो. भारतातील अंड्यांची वाढती मागणी पाहिल्यास कुक्कुटपालन हा उत्पन्नाचा चांगला स्रोत बनत आहे. कमी खर्चात हा व्यवसाय सुरू करून तुम्ही अधिक कमाई करू शकता. देशात दोन प्रकारचे कुक्कुटपालन केले जाते. ज्यामध्ये घरामागील कुक्कुटपालन आणि पोल्ट्री फार्ममध्ये कोंबड्या पाळल्या जातात. जर तुम्ही पोल्ट्री फार्ममध्ये कोंबडी पाळली तर त्यासाठी मोठी जागा आणि जास्त खर्च लागतो. परंतु परसातील कुक्कुटपालन कमी जागेत कमी प्रमाणात करता येते. कृषी जागरणच्या या लेखात जाणून घेऊया की परसातील कुक्कुटपालन म्हणजे काय आणि आपण ते कसे सुरू करू शकतो?. घरामागील कुक्कुटपालन म्हणजे काय? परसातील कुक्कुटपालन तुम्ही तुमच्या घराच्या अंगणात किंवा घराच्या मागे असलेल्या मोकळ्या जागेत सहज करू शकता. यामुळे तुम्हाला काही देशी कोंबडीच्या जाती निवडाव्या लागतील. जेणेकरून तुमचे उत्पन्न वाढेल. देशी कोंबड्या किडे, हिरवा चारा, घरी सोललेली फळे आणि भाजीपाल्याची साले, तणांमधील धान्ये खाऊन जगू शकतात. परंतु जर तुम्हाला त्यांच्याकडून चांगले उत्पादन हवे असेल तर या कोंबड्यांना काही अतिरिक्त खाद्य द्यावे लागेल. ज्यामध्ये बाजरी, मका, तांदूळ याचा समावेश असतो.

घरामागील कुक्कुटपालन कसे सुरू करावे?

घरामागील कुक्कुटपालन करण्यासाठी तुम्हाला थोडी जागा हवी आहे. येथे तुम्ही २० ते २५ कोंबड्या पाळाव्यात. प्रामुख्याने स्थानिक जातीच्या कोंबड्या पाळाव्यात. कारण त्यांच्या अंड्यांना बाजारात विशेष मागणी आहे. देशी जातीच्या कोंबड्या महागड्या विकल्या जातात, त्यांचा दर निश्चित नाही, उलट खरेदीदार आणि विक्रेते आपापसात त्यांचे दर ठरवतात. परसातील कुक्कुटपालनात खाद्यावर फारसा खर्च होत नाही. स्थानिक जातीचे कोंबडे आणि कोंबड्या सकाळपासून संध्याकाळपर्यंत खाद्य शोधत असतात.

परसातील कुक्कुटपालनासाठी चांगली जात परसातील कुक्कुटपालनातील सर्वात कठीण काम म्हणजे चांगल्या जाती निवडणे. फक्त चांगल्या जातीच्या कोंबड्या तुमचा नफा वाढवू शकतात. त्यामुळे घरामागील कुक्कुटपालन सुरू करण्यापूर्वी कोंबड्या आणि कोंबड्यांच्या सुधारित जातींची माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे. घरामागील कुक्कुटपालनासाठी तुम्ही देशी कोंबड्या, कडकनाथ, स्वरनाथ, ग्रामप्रिया, केरी श्यामा, निर्भिक, श्रीनिधी, वनराजा, कारी उज्ज्वल आणि कारी इत्यादी जातींच्या कोंबड्या पाळू शकता.

परसातील कुक्कुटपालनातून मोठा नफा परसातील कुक्कुटपालनात येणाऱ्या कोंबड्या तयार होण्यास जास्त वेळ लागत नाही. स्थानिक जातीच्या कोंबड्या ७ ते ८ महिन्यांत तयार होतात, तर सुधारित जातीच्या कोंबड्यांचे वजन ४ ते ५ महिन्यांत सुमारे एक ते दीड किलोपर्यंत पोहोचते. जर तुम्ही मोठ्या संख्येने कोंबड्या पाळल्या तर त्यांच्याकडून तुम्हाला दरवर्षी लाखोंचा नफा मिळू शकतो. याशिवाय देशी जातीच्या कोंबड्यांच्या मांसाला बाजारात जास्त मागणी आहे, त्यांचे मांस येथे विकूनही तुम्ही चांगला नफा कमवू शकता.

## फळबाग क्षेत्रातील मातीचा नमुना घेण्याची पद्धत

फळबागेसाठी जमिन उत्तम निचरा होणारी असावी. ज्या जमिनीत चुनखडीचे प्रमाण अधिक आहे, अशा जमिनीत फळबाग घेऊ नये. माती परिक्षणासाठी सर्वसाधारण पिकाचे क्षेत्रामधील ज्याप्रमाणे मातीचे नमुने घेतले जातात, त्यापेक्षा थोडया वेगळया पध्दतीने मातीचे नमुने तपासणीसाठी घेणे आवश्यक आहे.

फळबागेतून मातीचे नमुने घेताना फळबाग किती जुनी आहे हे विचारात घेणे आवश्यक आहे. फळबाग नव्यानेच केली असेल, तर अशा क्षेत्राचे नमुने घेताना १०० से.मी. खोलीपर्यंत अथवा मुरुम लागेपर्यंत प्रत्येक ३० सें.मी. (१ फुट) थराचे म्हणजेच ० ते ३० से.मी. (पहिला थर), ३० ते ६० सें.मी. (दुसरा थर) आणि ६० ते ९० से.मी. (तिसरा थर) या प्रमाणे मातीचे नमुने स्वतंत्र घ्यावेत. शक्य असल्यास नमुने घेताना जमिनीचे थर स्पष्टपणे वेगवेगळे दिसत असतील, तर अशा वेगवेगळया थरांचे मातीचे नमुने घेणे अधिक चांगले, असे मातीचे नमुने घेतल्याने मातीमध्ये अन्नद्रव्यांचे प्रमाण, चुनखडीचे प्रमाण किती आहे हे आजमाविणे शक्य होईल.

फळबाग जुनी असल्यास : फळबाग जुनी, अधिक वर्षाची असेल, फळझाडांची वाढ चांगली झाली असेल तर अशा क्षेत्रातून मातीचे नमुने घेतांना फळझाडांना अन्नपुरवठा होणाऱ्या क्षेत्राचा विचार करणे आवश्यक आहे. साधारणपणे झाडाच्या बुंध्यापासून २ ते ४ फूट लांब व दुपारी १२ वाजता झाडाची सावली ज्या भागात पडत असेल, त्या भागाच्या बाहेरचा दीड ते दोन फूट एवढा भाग सोडून मधल्या भागातून झाडांना जास्तीत जास्त अन्न पुरवठा होतो असे समजण्यात येते, अशा भागातून १२ इंच (किंवा ३० से.मी.)



खोलीचे मातीचे नमुने घ्यावेत. प्रातिनिधीक नमुन्यासाठी जमिनीच्या प्रकारानुसार विभाग करुन प्रत्येक भागातील साधारण: झाडाच्या भोवतालचे वरीलप्रमाणे नमुने घेऊन ते एकत्र करुन सर्वसाधारणपणे एक किलोग्रॅम मातीचा नमुना स्वच्छ कापडी पिशवतीत भरुन प्रयोगशाळेत पाठवावा.

नोंदीची गरज : फळबागांचे पाणी व अन्नद्रव्यांचे व्यवस्थापन ठिबक सिंचनाद्वारे असल्यास अशा फळबागेतील जमिनीत झाडाखालील ओल्या मातीचा जो कंद तयार होतो, त्या कंदाच्या कडेवरील दोन्ही बाजूंकडील माती प्रयोगशाळेत तपासणीसाठी द्यावी. ओली माती प्रथम सावलीत सुकवून नंतर प्रयोगशाळेत पाठवावी. त्यासोबत शेतकऱ्याने स्वत:चे नांव, गाव, सर्व्हे नंबर, जमिनीची खोली, फळबागेचे वय इत्यादी माहितीसह प्रयोगशाळेत पाठवून द्यावे. विशेष समस्या असल्यास तसा उल्लेख माहितीसोबत करावा.

मातीचा नमुना घेताना घ्यावयाची काळजी : मातीचा नमुना घेण्यासाठी वापरात येणारी अवजारे उदा :-फावडे, कुदळ, घमेले, खुरपी इ. स्वच्छ असावीत. मातीचा नमुना पिके काढल्यानंतर परंतु नांगरणी पूर्वी घ्यावा. शक्यतो रब्बी पिकाच्या काढणीनंतर किंवा उन्हाळयात घेतल्यास पृथ:करण करुन परिक्षण अहवाल पेरणीपर्यंत उपलब्ध होतो. उभ्या पिकांतील मातीचा नमुना घ्यावयाचा असेल तर दोन ओळीमधील मातीचा नमुना घ्यावा परंतु पिकास रासायनिक खत दिले असल्यास तीन महिन्याच्या आत संबंधित जमिनीतून माती नमूना घेवू नये. निरनिराळ्या जमिनीतील नमुना गोळा करताना वेगवेगळया मातीचे नमुने एकत्र मिसळू नयेत. माती नमुना गोळा करताना किंवा प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविताना रासायनिक खताच्या रिकाम्या पिशव्यांचा वापर करु नये. शेतामधील खते साठविण्याची जागा, कचरा टाकण्याची जागा, जनावरे बसण्याची जागा, झाडाखालील जागा, विहिरीजवळ, पाण्याचे पाट व शेताचे बांध इत्यादी जागामधून किंवा जवळून मातीचे नमुना घेवू नयेत. शक्य तितक्या लवकर नमुने प्रयोगशाळेत पाठवावेत.

सर्व साधारणपणे नमुना काढणे व प्रयोगशाळेत पाठविणे ह्यात दोन आठवडयापेक्षा अधिक काळ नसावा. अन्यथा माती पृथ:करण बदलण्याची शक्यता असते. फळबागेसाठी मातीचा नमुना वेगवेगळया थरातून घ्यावा उदा.खड्डा खोदून पहिल्या एक फुटातील ३० से.मी. पर्यंत मुरुम नसल्यास ३० ते ६० से.मी. थरातील दुसरा थर व खोल जमिनीत ६० ते ९० से.मी. पर्यंत खोलीतील तिसऱ्या थरातील मातीचे नमुने स्वतंत्र घ्यावे व प्रयोग शाळेत पाठवावे. जमिन क्षारयुक्त व क्षारयुक्त-चोपण असल्यास पृष्ठभागावरील दोन से.मी. मधील क्षार बाजूला करुन नंतरच नमुना घ्यावा. सुक्ष्म अन्नद्रव्ये तपासणी करावयाची असल्यास लाकडी खुंटी अथवा लाकडी औजाराने मातीचा नमुना घ्यावा. कोणत्याही परिस्थितीत लोखंडी अथवा अन्य धातुंची अवजारे अथवा उपकरणे, माती नमुना घेण्यासाठी वापरु नका. सुक्ष्म अन्नद्रव्यांसाठी माती नमुना घेताना जास्तीत जास्त काळजी घेणं गरजेचे आहे. पिशवीवर सुक्ष्मअन्नद्रव्ये तपासणीसाठी नमुना अशी नोंद करावी. मातीच्या नमुना कोठे व कसा पाठवाल ?मातीचा नमुना घेतल्यानंतर खालील माहिती लिहून ती, मातीचा नमुना असलेल्या पिशवीत टाकावी, मातीचा नमुना लवकरात लवकर जवळच्या माती परिक्षण प्रयोगशाळेकडे पाठवावा.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६१ : प्रिन्स सेसी या शास्त्रज्ञाने प्रथमच दुर्बिणीसाठी टेलिस्कोप ही संज्ञा वापरली.

१६६५ : सुप्रसिद्ध पुरंदरच्या वेढ्यामधे दिलेरखान पठाणने वज्रमाळ किल्ला जिंकला.

१७३६ : चिमाजीअप्पांनी मोघल बादशहाचा हस्तक जंजिरा येथील सिद्दीसाताचा पराभव करुन मराठी सत्तेचा दरारा बसविला.

१८६५ : जॉन विल्कस बूथने अब्राहम लिंकनवर गोळी झाडली. लिंकन दुसर्या दिवशी मृत्यू पावला.

१९१२ : आर.एम.एस. टायटॅनिकची हिमनगाशी टक्कर. बोटीला भगदाड पडून बुडु लागली.

१९४४ : मुंबईच्या बंदरात उभ्या असलेल्या बोटीवर महाभयानक विस्फोट. ३०० ठार. त्याकाळच्या २ कोटी पाउंडचे नुकसान.

१९४४ : मुंबई गोदीत उभ्या असलेल्या 'फोर्ट स्टिकिन' या मालवाहू जहाजावर दुपारी ४ वाजुन ५ मिनिटांनी भीषण स्फोट होऊन ३०० जण ठार झाले आणि (त्याकाळच्या) सुमारे २ कोटि पौंडा इतके आर्थिक नुकसान झाले.

१९८६ : बांगलादेशमध्ये १ किलो वजनाच्या अतिप्रचंड गारांचा वर्षाव. ९२ ठार. गारांच्या वजनाचा हा विक्रम अजुन अबाधित आहे.

१९९५ : टेबल टेनिसमधे सलग ६,६७० रॅलीज करण्याचा जागतिक विक्रम डॉ. रमेश बाबू यांनी पुण्यात नोंदवला.

२००८ : भारतातील कोलकत्ता व बांगलादेशाची राजधानी ढाका या दोन देशादरम्यान रेल्वे सेवा सुरु करण्यात आली.

२०१० : पश्चिम बंगाल, उडीसा, झारखंड आणि बिहार राज्यात आलेल्या चक्रवर्ती वादळामुळे सुमारे १२३ लोकांचे निधन झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६२९ : क्रिस्टियन हायगेन्स डच गणितज्ञ, खगोलविद्? आणि पदार्थवैज्ञानिक, लंबकाच्या घड्याळाचा शोध (मृत्यू: ८ जुलै १६९५)

१६७५ : छत्रपती शिवाजी महाराज यांचे धाकटे पुत्र छत्रपती राजाराम भोसले यांच्या दुसऱ्या पत्नी राणी ताराबाई भोसले यांचा जन्मदिन.

१८३३ : व्हिक्टोरिया क्रॉसचे प्राप्तकर्ता रॉस लोव्हिस मंगल्स व्हीसी यांचा जन्मदिन.

१८९१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाचे खंदे नेते, अस्पृश्य समजल्या जाणार्या जातितील पहिले मॅट्रिक व पहिले पदवीधर, इंग्लंडमध्ये वकिलीतील बॅरिस्टरची परीक्षा दिली आणि अर्थशास्त्रात डॉक्टरेट मिळवली. (मृत्यू: ६ डिसेंबर १९५६)

१८९१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार.

१८९८ : स्वातंत्र्यपूर्व भारतातील नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या आझाद हिंद सरकारमधील प्रसिद्धी व प्रचार प्रमुख सुब्बीर अप्पादुराई यांचा जन्मदिन.

१९०७ : भारतीय कम्युनिस्ट चळवळीचे प्रारंभिक नेते व माजी सरचिटणीस पूरणचंद जोशी यांचा जन्मदिन.

१९१४ : शांता हुबळीकर अभिनेत्री (मृत्यू: १७ जुलै १९९२)

१९१९ : शमशाद बेगम पार्श्वगायिका (मृत्यू: २३ एप्रिल २०१३)

१९२२ : उस्ताद अली अकबर खाँ तथा खाँसाहेब मैहर घराण्याचे जागतिक कीर्तीचे सरोदवादक, पद्?मविभूषण (१९६९), मॅकआर्थर फेलोशिप, संगीत नाटक अकादमी फेलोशिप, नॅशनल हेरिटेज फेलोशिप (मृत्यू: १८ जून २००९ सॅन अन्सेल्मो, कॅलिफोर्निया, यू. एस. ए.)

१९२७ : द. मा. मिरासदार विनोदी लेखक (मृत्यू: )

१९३३ : सर्जनशील कला अकादमीचे संस्थापक-प्राचार्य अनिल कुमार दत्ता यांचा जन्मदिन.

१९४२ : मार्गारेट अल्वा केंद्रीय मंत्री व राजस्थानच्या राज्यपाल

१९४३ : रामदास फुटाणे वात्रटिकाकार

१९५७ : भारतीय मल्याळम स्त्रीवादी लेखिका आणि नाटककार के. सरस्वती अम्मा यांचा जन्मदिन.

१९५७ : भारतीय अवकाश वैज्ञानिक आणि भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे अध्यक्ष तसचं, विक्रम साराभाई स्पेस सेंटर आणि लिक्विड प्रोपल्शन सिस्टम सेंटरचे माजी संचालक कैलासावादिव शिवन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९५० : भारतीय तत्त्ववेत्ते योगी रमण महर्षी तथा वेंकटरमण अय्यर समाधिस्थ झाले. चैत्र व. १२ शके १७८३ (जन्म: ३० डिसेंबर १८७९)

१९६२ : सर मोक्षगुंडम्? विश्वेश्वरैया, भारतीय अभियंता.

१९६२ : भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या अभियंते, विद्वान, मुत्सद्दी आणि मैसूर संस्थानचे दिवाण

१९६३ : केदारनाथ पांडे तथा राहूल सांकृतायन इतिहासकार (जन्म: ९ एप्रिल १८९३)

१९९७ : चंदू पारखी चित्रपट आणि नाट्य अभिनेते (जन्म:)

१९९८ : भारतीय चित्रपट दिग्दर्शक, छायाचित्रकार व पटकथालेखक नितीन बोस यांचे निधन.

२०१३ : राम प्रसाद गोएंका उद्योगपती (जन्म: १ मार्च १९३०)

cmyk

राज्य लोकतंत्र
# मराठवाडा वृत्तांत

मंगळवार दि.१४ एप्रिल २०२६ ५

# जनगणना करताना ओबीसीची पण जनगणना करा-प्रा. मोराळे

बीड। प्रतिनिधी

भारत सरकारने विरोधी पक्ष नेता राहुल गांधींच्या वारंवार सभागृहातील मागणीचा विचार करून जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. ही जनगणना करण्यासाठी शासनाकडून पूर्ण तयारी करण्यात आली आहे. ३३ मुद्यांची माहिती बीएलओना भरावी लागणार आहे. परंतु दुर्दैव असे की, १९३१ च्या इंग्रज सरकारने केलेल्या जनगणनेत ओबीसी ची जनगणना झाली होती तेव्हा देशाच्या लोकसंख्येत ५२% ओबीसी असल्याचा अहवाल समोर आला होता. १९४७ ला देश स्वतंत्र झाला त्यानंतर १९५१ ते २०११ पर्यंत देशाने जनगणना केली असली तरी ओबीसींना मोजले गेले नाही. २०११ नंतर २०२१ ला जनगणना होणे अपेक्षित होते परंतु कोविडचे संकटाचे कारण पुढे केले गेले आणि २०२६ एप्रिल पासून ही जनगणना होणार आहे. मात्र त्यात ओबीसी जनगणना होणार नसल्याचे सिद्ध झाले आहे. सरकार ओबीसींना का घेत आहे हे समजू शकलेले नाही. ही जनगणना ओबीसी सहित करावी अशी मागणी ओबीसी बचाव संघर्ष समितीच्या वतीने आपण माननीय प्रधानमंत्री भारत सरकार यांना करीत आहोत. आज




दिनांक १३ एप्रिल रोजी माननीय जिल्हाधिकारी बीड यांच्या कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले त्या प्रसंगी जिल्ह्यातील ओबीसी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

७ ऑगस्ट १९९० देशातील जनता दलाच्या सरकार व मित्र पक्षाच्या सरकारने देशातील ५२ टक्के ओबीसींना नोकरी आणि शिक्षण क्षेत्रात सत्तावीस टक्के आरक्षण जाहीर केले. ओबीसी जनगणना व्हावी म्हणून २ ऑक्टोंबर २०१३ पर्यंत ही जनगणना करू या मागणीसाठी ओबीसी संघर्ष समितीच्या वतीने पाच लाख सह्यांचे निवेदन माननीय प्रधानमंत्री यांना देण्यात आले दिनांक ९ ऑगस्ट ते २ ऑक्टोंबर या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात त हे अभियान संघटनेने राबवले होते.

२ ऑक्टोंबर २०११ रोजी देशाच्या संसदेत ओबीसी जनगणनेचा ठरावही मनमोहन सिंग सरकारने पारित केला होता. त्यापूर्वी १९९६ मध्ये देवेगोडा यांच्या नेतृत्वातील जनता दल सरकारने ओबीसी जनगणनेचा ठराव घेतला होता परंतु त्यांचे सरकार पाडण्यात आले आणि हा प्रश्न प्रलंबित राहिला दर दहा वर्षांनी जनगणना व्हायला पाहिजे कारण देशाचे बजेटचे नियोजन करण्यासाठी जनगणना आवश्यक असते. तब्बल १६ वर्षांनी ही जनगणना होत आहे २०११ च्या जनगणने देशाची लोकसंख्या १२१ कोटी पेक्षा जास्त होती त्याच आकड्यानुसार देशाचे बजेट दरवर्षी केले जात आहे. कदाचित हा आकडा आता १५० कोटी होईल वाढत्या लोकसंख्येसाठी पाणी, आरोग्य, शिक्षणाच्या सुविधा त्या प्रमाणात करणे गरजेचे असते. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची जनगणना होते त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात बजेटची तरतूदही केली जाते मात्र ओबीसीचा नक्की आकडा नसल्यामुळे प्लॅनिंग मध्ये त्यांना स्थान नाही. आजचे केंद्र सरकार व राज्य सरकार दोघांनाही प्रचंड संख्येने मतदान ओबीसी देतात मात्र ओबीसीची जनगणना करायला सरकार तयार नाही. केंद्रात २७ मंत्र्यांसह प्रधानमंत्री मोदी जी ओढून ताणून का होईना ओबीसी आहेत पण उपयोग काय मराठीचा दांडा गोतास काळ असतो. त्या म्हणीप्रमाणे मोदीजी ओबीसी आहेत पण ते मजबूर प्रधानमंत्री आहेत.

जोपर्यंत नागपूर संघाचे त्यांचे आक्षा त्यांना ओबीसी जनगणना करायला परवानगी देत नाहीत तोपर्यंत मोदीजी मजबूर आहेत. झोपेचे सोंग घेतलेला ओबीसी जनसमुदाय मात्र याबाबत अनभिज्ञ आहे.

१९९० ला ३७४३ जाती देशात ओबीसी प्रवर्गात होत्या महाराष्ट्रात ही संख्या २७२ इतकी होती त्यानंतर मंडल आयोगाकडून मोजायच्या राहिलेल्या जाती जागा झाल्या आता संपूर्ण देशात ही संख्या किमान ४५०० इतकी झाली असणार आहे. राज्यात ३५० पेक्षा जास्त ही संख्या आज तारखेला आहे. मराठा समाजातील, जाती फोड जाती कुणबी यांचाही नव्याने समावेश ओबीसी प्रवर्गात झाला आहे.

मी जरांगे पाटील साहेबांना नम्र आवाहन करते की केवळ ओबीसी प्रवर्गात समाविष्ट होऊन चालणार नाही त्यासाठी ओबीसीची जनगणना होणे गरजेचे आहे आपण या लढ्याचे नेतृत्व करावे अशी विनंती आम्ही ओबीसी संघर्ष समितीच्या वतीने आपणास करीत आहोत. या प्रसंगी श्री कल्याण काका आखाडे, ऍड सुभाष राऊत, बापूराव भालेकर, देविदास चव्हाण, डॉक्टर संजय तांदळे, प्रा. भगवान माने, प्रा. लक्ष्मण गुंजाळ, मीनाक्षी देवकते, अर्जुन दळे, विशाल राऊत, प्रा. बाळासाहेब मतकर, गणेश जगताप, राजेंद्र दराडे, रवी बांगर, संतोष काळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## सत्ता आमची लालसा नसून समाज संघटन आमचे उद्दिष्ट आहे - आ.संजय केनेकर



जालना। प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी कार्यालय, जालना येथे दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता भाजपा जालना महानगर व जालना ग्रामीण जिल्हा या दोन्ही जिल्ह्यातील सर्व प्रमुख पदाधिकारी नवनियुक्त लोकप्रतिनिधी, सर्व आघाड्यांचे संयोजक यांची महत्वपूर्ण बैठक आ.नारायण कुचे व भास्कर आबा दानवे या दोन्ही जिल्हाध्यक्षांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाली. यावेळी बोलताना आ.संजय केनेकर म्हणाले की, सत्ता आमची लालसा नसून सर्व समाज संघटन करून अखंड भारतभर सर्व समाज एका ठिकाणी आणून पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या स्वप्नातील शेवटच्या घटकातील व्यक्तीचा जिवनस्तर उंचावून त्यांचे स्वप्न साकार करणे हे आमचे उद्दिष्ट आहे, असे ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पदवीधर मराठवाडा नोंदणी प्रमुख मधुकरराव देशमुख, भाजपा जेष्ठ नेते माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर पाटील भांदरगे, विश्वजित खरात, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा शुभांगी देशपांडे, , जिल्हा सरचिटणीस अनिलराव कोलते, सुनील पवार, गोविंद ढेंबरे, वसंत शिंदे, शिवप्रकाश चितळकर, अरुणा जाधव, जिल्हा उपाध्यक्ष आनंद झा, सिद्धिविनायक मुळे, माजी जिल्हा सरचिटणीस देविदास देशमुख, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, महेश निकम, संजय डोंगरे, भगवान मात्रे, नाना भागिले, राजू साळवे, नगरसेवक अर्जुन गेही यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ.केनेकर म्हणाले की, भारतीय जनता पार्टी ने मंडळ स्तरापर्यंत कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग घेऊन वैचारिक अधिष्ठान, पक्षाचा इतिहास व विस्तार, संघटना विस्ताराची दृष्टी, आपली कार्यपद्धती, आपल्या सरकारची कामगिरी, बूथ व्यवस्थापन इत्यादी विषयांची मांडणी विषय अभ्यास्काद्वारे प्रशिक्षण वर्गात पदाधिकाऱ्यासमोर मांडून सर्व विषय पदाधिकाऱ्याना सविस्तर समजून सांगण्यात आले. तसेच सोशल मिडिया , नमो ॲप, सरल ॲप या वरती मंडळ प्रशिक्षणास उपस्थिती असलेल्या उपस्थितांची नोंदणी प्रदेश स्तरापर्यंत करण्यात आलेली आहे. यावेळी ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे व महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी जिल्ह्यात झालेले प्रशिक्षण वर्ग व आगामी होत असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती पूर्व तयारी तसेच नारी वंदन अभियान पूर्व तयारी याची सविस्तर माहिती प्रदेश सरचिटणीस व जालना जिल्हा प्रभारी आ.संजयजी केनेकर यांच्यासमोर सांगितली. यावेळी दुर्गेश कुरील, सोमेश काबलिये, सतीश केळकर, रोहित भुरेवाल, आदींची उपस्थिती होती.

## पाथर्डी शहरात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी

पाथर्डी प्रतिनिधी

पाथर्डी शहरात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक व शोभायात्रा काढून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी आमदार मोनिका राजळे ज्येष्ठ नेते एड.प्रताप ढाकणे नगराध्यक्ष अभय आव्हाड उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे नगरसेवक नंदकुमार शेळके अमोल गर्जे प्रतीक खेडकर समता परिषदेचे रमेश गोरे युवा नेते रोहित पुंड देवा पवार योगेश रासने रमेश हांडाळ तसेच महिला ज्येष्ठ कार्यकर्ते व समता परिषद फुले उत्सव समिती पदाधिकारी उपस्थित होते महात्मा ज्योतिबा फुले यांनी महिला शिक्षणाचा पाया रोवून भारतातील शिक्षणाचे दार वंचित पीडित शेतकरी कष्टकरी यांच्यासाठी खुले केले महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना



करत समाजातील जातीभेद अंधश्रद्धा अस्पृश्यता या विरोधात कडाडून लढा दिला तसेच विधवांना पुनर्विवाह यासाठी संघर्ष केला.

पूर्वाश्रमीचे भाजपचे तत्कालीन जिल्हाध्यक्ष असलेले एड.प्रताप ढाकणे हे २०१४ ला भाजप सोडून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात दाखल झाले लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या अपघाती निधनानंतर २०१४ ची विधानसभा प्रताप ढाकणे यांनी लढवली नाही परंतु २०१९ व २०२४ या दोन्ही विधानसभा निवडणुकीत प्रताप ढाकणे यांना निसटता पराभव स्वीकारावा लागला असल्याने सध्या तरी ते राष्ट्रवादी शरद पवार पक्षात असले तरी पाथर्डी शहरात होत असलेल्या सार्वजनिक कार्यक्रमाच्या निमित्ताने आमदार मोनिका राजळे यांच्यासमवेत प्रताप ढाकणे हे दिसत आहेत तसेच विविध नारळी सप्ताहाच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संपर्कात प्रताप ढाकणे असल्याचे बोलले जात असल्याने प्रताप ढाकणे भाजप प्रवेश करणार का या चर्चांना उधाण आले आहे.

## जमीन विक्रीच्या नावाखाली तब्बल १.९० कोटीचा गंडा

छत्रपती संभाजीनगर

जमीन आधीच दुसऱ्या व्यक्तीला विकलेली असतानाही त्या व्यवहाराची माहिती लपवून खोटे व बनावट जीपीए (कुलमुखत्यारपत्र) तयार केले. त्यानंतर सिल्लोड येथील एका व्यापाऱ्याकडून तब्बल १ कोटी ९० लाखांहून अधिक रुपये उकळवून गंडा घालणाऱ्या टोळीतील मुख्य सूत्रधारासह दोघांना आर्थिक गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या.

मुंबईतील वर्सोवा येथून तर शेख जमील शेख रसूल (रा. रोजेबाग) याला शहरातूनच बेड्या ठोकळ्याची माहिती पोलिस निरीक्षक संभाजी पवार यांनी दिली. सिल्लोड येथील आडत व्यापारी शेख इम्रान (३७) यांच्या तक्रारीनुसार, आरोपी शेख इरफान याने हिमायतनगर येथील गट क्र. १९/१ मधील जमिनीचा सौदा २ कोटींत झाला असून, गुंतवणुकीसाठी २५ लाख रुपये कमी पडत असल्याचे सांगून इम्रान यांचा विश्वास संपादन केला. त्यांच्याकडून वेळोवेळी आरटीजीएस, फोन-पे आणि रोख स्वरूपात एकूण १ कोटी ९० लाख २५ हजार उकळले. पैशाच्या बदल्यात हिमायतनगर येथील ले-आउटमधील प्लॉट क्र. ९० आणि ९१ देण्याचे आमिष आरोपींनी दाखविले. पैसे घेऊनही प्लॉटची रजिस्ट्री करून देण्यास टाळाटाळ करण्यात आली. पुन्हा आरोपींनी जोगवाडा येथील १६ एकर जमिनीचे कुलमुखत्यारपत्र इम्रानच्या नावे केले. मात्र ही जमीन आधीच दुसऱ्याला विकलेली असल्याचे तलाठी कार्यालयातील चौकशीत उघड झाले. शेख इम्रान यांनी परिसरात चौकशी केली असता, आरोपी इरफान याने अशाच प्रकारे इतरही अनेक लोकांकडून पैसे घेऊन त्यांना गंडा घातल्याचे समोर आले आहे होते. सिटी चौक ठाण्यात गुन्हा दाखल होऊन तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला होता. आरोपी शेख इरफान फरार होता. पथकाने त्याला ६ एप्रिल रोजी मुंबईतील वर्सोवा येथून अटक केली. न्यायालयाने त्याला ११ एप्रिल पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. तर दुसरा आरोपी शेख जमील याला ९ एप्रिल रोजी अटक केली.

## मोटारसायकल घसरल्याने दरोडेखोर जाळ्यात

धाराशिव। प्रतिनिधी

वाशी तालुक्यातील गोलेगाव शिवारातील सेरेंटिका कंपनीच्या पवनचक्की गोडाऊनवर दरोडा टाकण्याच्या उद्देशाने आलेल्या टोळीतील एक जण मोटारसायकल घसरल्याने पोलिसांच्या ताब्यात आला असून त्याचे चार साथीदार फरार झाले आहेत.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गोडाऊनवर सेक्युरिटी गार्ड म्हणून कार्यरत असलेले दत्तात्रय कागदे व त्यांचे सहकारी १० एप्रिल रोजी पहाटे तीनच्या सुमारास गस्त घालत असताना दोन विनानंबर मोटारसायकलींवरून पाच संशयित लोक तेथे आले. गार्डने बॅटरीचा प्रकाश टाकताच एकाने तलवारीसारखे हत्यार काढून त्यांच्याकडे धाव घेतली, तर इतरांनी दगडफेक करत गोडाऊनचे गेट तोडण्याचा प्रयत्न केला. गार्डने तात्काळ पोलिसांना माहिती दिल्यानंतर गस्त घालणारे पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांची चाहूल लागताच संशयितांनी पळ काढला.

## भूमीअभिलेख कार्यालयातील सुनील साबळे व दिनेश पुसदकर यांच्यावर कारवाई करण्याचे संकेत?

### भालगाव येथील पांडुरंग घुले शेतजमिनीत अतिक्रमण आणि मोजणी फेरफार प्रकरण

पाथर्डी प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील भालगाव येथील पीडित शेतकरी पांडुरंग मायनजी घुले व त्यांचे दोन मुलं हरी पांडुरंग घुले वसंत पांडुरंग घुले या बंधूंच्या शेतजमीन गट नंबर ४२४ ४२५ व ३९१ शेतजमिनीत (वहिवाट आणि बांध) सामनेवाले एकनाथ घुले यांच्यात शेतजमीनमोजणी वरून वाद आहे.

यासंदर्भात पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन उपअधीक्षक निखिल मोरे दिनेश पुसदकर सुनील साळवे यांच्या भ्रष्ट कारभारामुळे वसंत घुले आणि हरी घुले यांच्या शेतजमिनीमध्ये एकनाथ घुले यांनी वहिवाटीत अतिक्रमण केले असल्याची तक्रार थेट महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे बनावट दस्तावेज तयार करून मोजणीत फेरफार केल्याप्रकरणी पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन

> पाथर्डी भूमिअभिलेख कार्यालयातील भ्रष्ट कर्मचारी निखिल मोरे दिनेश पुसदकर व सुनील साळवे यांनी पीडित शेतकरी मायनजी घुले यांच्या शेत जमिनीतील गट नंबर ३९१ ४२४ व ४२५ मोजणीत फेरफार केला असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे शेत जमिनीतील हद्दीखुणा बदलल्या गेल्या अशी तक्रार आहे याची फेर पडताळणी करून अहवाल मागवला आहे अहवाल येताच दोषी कर्मचारी सुनील साळवे व दिनेश पुसदकर यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात येईल.
>
> **-संजय कुंभार - जिल्हाअधीक्षक भूमीअभिलेख कार्यालय अहिल्यानगर)**

कर्मचारी निखिल मोरे व विद्यमान कर्मचारी दिनेश पुसदकर व सुनील साबळे यांचे निलंबन करण्याची मागणी करूनही अद्यापही अहिल्यानगर भूमिअभिलेख जिल्हा अधीक्षक संजय कुंभार यांनी भ्रष्ट कर्मचारी निखिल मोरे दिनेश पूसदकर व सुनील सावळे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात येणार असल्याची सुतवाच केले आहे.

पाथर्डी भूमिअभिलेख कार्यालयातील तत्कालीन उपाधीक्षक निखिल मोरे दिनेश पुसदकर व सुनील साळवे यांनी लाखो रुपयांची आर्थिक देवाणघेवाण करून संगनमताने भालगाव येथील शेतकरी पांडुरंग मायनजी घुले त्यांचे मुलं वसंत घुले व हरी घुले यांच्या शेतजमीन गटनंबर ३९१ ४२४ व ४२५ जमीन मोजणीमध्ये २०/१२/२०२४ २०/०६/२०२५ तारखेला केलेल्या हद्दीखुणा २०/३/२०२६ रोजी केलेल्या हद्दीखुणा गट नंबर ३९१ मध्ये कायम मोजणी सीट व पोटहिस्सा यामध्ये सुद्धा प्रचंड तफावत जाणवत आहे.

## आय.एम.ए.च्या अध्यक्षपदी डॉ. बळीराम बागल तर सचिव डॉ प्रल्हाद धारुरकर



जालना। प्रतिनिधी

जालना येथील इंडियन मेडिकल असोसिएशनच्या (आय.एम.ए.) २०२६-२७ या वर्षासाठीच्या नवीन कार्यकारिणीची निवड दि. ११ एप्रिल २०२६ रोजी उत्साहात पार पडली. या नवीन समितीच्या अध्यक्षपदी डॉ. बळीराम बागल यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

नवीन कार्यकारिणी खालीलप्रमाणे अध्यक्ष: डॉ. बळीराम बागल उपाध्यक्ष: डॉ. राजीव डोईफोडे सचिव: डॉ. प्रल्हाद धारूरकर कोषाध्यक्ष: डॉ. प्रितेश भक्कड रुग्णसेवा आणि समन्वयावर नवीन समितीचा भर निवडीनंतर आपले मानस व्यक्त करताना नवीन कार्यकारिणीने स्पष्ट केले की, जालना शहर व परिसरातील रुग्णांना अत्याधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हे संघटनेचे मुख्य उद्दिष्ट असेल. विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून जटील () वैद्यकीय प्रक्रिया शहरातील रुग्णालयांमध्ये अधिक सुलभतेने राबवण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

तसेच, रुग्ण, लोकप्रतिनिधी आणि डॉक्टर्स यांच्यामधील परस्पर संवाद वाढवून त्यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक घट्ट करण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या निवड प्रक्रियेवेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून नवीन समितीला मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्रीमंत मिसाळ होते. याप्रसंगी मागील वर्षाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळणारे मावळते अध्यक्ष डॉ. चारूस्मिता हवालदार, सचिव डॉ. सोनल रुणवाल आणि कोषाध्यक्ष डॉ. गोविंद पाटील यांनी नवीन समितीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या पदग्रहण समारंभास जालना आय.एम.ए. चे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गेवराईत खळबळ: गायरान जमिनीच्या वादातून हत्या, अवघ्या सहा तासांत आरोपींना बेड्या

**गेवराई । प्रतिनिधी**

गायरान जमिनीचा बांध कोरल्याच्या क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर हत्येत झाल्याची धक्कादायक घटना गेवराई तालुक्यातील रामनगर तांडा येथे घडली आहे. या प्रकरणातील आरोपींना गेवराई पोलिसांनी अवघ्या सहा तासांत शिताफीने अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रामनगर तांडा येथील फिर्यादी पपेश उर्फ गुडड्या अर्जुन माळी (वय ३१) यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांचे वडील अर्जुन साहेबराव माळी हे ११ एप्रिल २०२६ रोजी संध्याकाळी ५ वाजेच्या सुमारास गोंडगाव शिवारातील ताब्यात घेतलेल्या गायरान जमिनीकडे चक्कर मारण्यासाठी गेले होते. त्या ठिकाणी जमिनीच्या कारणावरून झालेल्या वादात मधुकर नायबा शिंदे, मनोहर मधुकर शिंदे आणि एका विधी संघर्षग्रस्त बालकाने त्यांना बेदम मारहाण केली.



या मारहाणीत अर्जुन माळी यांना गंभीर दुखापत झाली होती. त्यांना तातडीने प्राथमिक उपचारानंतर बीड येथील सरकारी रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. २१७/२०२६, कलम १०३(१), ३५२, ३(५) भारतीय न्याय संहितेनुसार खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक नवीनत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपींच्या शोधासाठी पथके छत्रपती संभाजीनगर, जालना आणि धाराशिव जिल्ह्यात रवाना करण्यात आली होती. आरोपींनी आपले मोबाईल बंद करून पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र तांत्रिक माहिती आणि गोपनीय सूत्रांच्या आधारे आरोपी बीड शहरातील बार्शी नाका परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी सापळा रचून मधुकर शिंदे आणि मनोहर शिंदे यांना शिताफीने ताब्यात घेतले. ही धडक कारवाई पोलीस निरीक्षक किशोर पवार, तपास अधिकारी सपोनि अण्णासाहेब पवार आणि त्यांच्या टीमने अवघ्या ६ तासांत पूर्ण केली. सध्या पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# पोकलेन ऑपरेटरचा अपघाती मृत्यू; सौताडा गावात हळहळ

पाटोदा । प्रतिनिधी

सौताडा (ता. पाटोदा, जि. बीड) येथील रहिवासी हनुमंत अरुण खंडागळे यांचा आळंदी येथे काम करत असताना झालेल्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे सौताडा गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, हनुमंत खंडागळे हे आळंदी पुणे परिसरात एका कन्ट्रक्शन कंपनीमध्ये पोकलेन () ऑपरेटर म्हणून काम करत होते. दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी दुपारच्या सुमारास साइटवर काम सुरू असताना त्यांच्या पोकलेन मशीनजवळ खाली जमिनीवर अचानक दगडाची मोठी दरड कोसळली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले.घटनेनंतर सहकाऱ्यांनी त्यांना तत्काळ मोशी येथील साईनाथ हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. मात्र दरड कमरेवर व संपूर्ण शरीरावर कोसळल्याने त्यांचा एक पाय जागीच निकामी झाला होता आणि मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला होता. डॉक्टरांनी अनेक वेळा रक्त चढवूनही रक्तस्त्राव नियंत्रणात येत नव्हता. उपचार सुरू असतानाच दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी पहाटे चार ते पाच वाजण्याच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. हनुमंत खंडागळे हे अत्यंत गरीब कुटुंबातील असून मेहनती व शांत स्वभावाचे म्हणून परिचित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, आई-वडील व भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे सौताडा गावात शोक व्यक्त करण्यात येत आहे.



**बीडचे पोलीस अमलदार सत्यनारायण खेत्रे यांची पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती झाली. त्याबद्दल सत्कार करताना एम. आय. एम. चे जिल्हाध्यक्ष एड. शेख शफिक भाऊ यांच्यासह खेत्रे यांचा मित्रपरिवार तुलशी गायकवाड, शरद कुलकर्णी, देशमुख, मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके आदी.**

# 'केजच्या 'प्रायव्हेट लिमिटेड काँग्रेस'ला सामान्य कार्यकर्त्यांनी आरसा दाखवला'

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यात काँग्रेस पक्षातील अंतर्गत नाराजी आता उघडपणे समोर येत असून, ''प्रायव्हेट लिमिटेड काँग्रेस'' अशी टीका करत सामान्य कार्यकर्त्यांनी नेतृत्वाला थेट आरसा दाखवण्याचे काम केले आहे. नेतृवाच्या डोकयातली हवा जायला तयार नाही, गेली ३५ वर्ष एक आमदार की एक फुटका खासदार निवडून आणता यईना, पक्षाला किती दिवस वेड्यात काढणार, मोठ मोठया गप्पा मारून पक्ष वाढत नसतो, आमचं काही वाकड होत नाही म्हणारे दिल्लीच्या निरीक्षक समोर कर्मचाऱ्यांना बसवून पक्ष वाढीच्या मोठ मोठया गप्पा मारत होते, स्वतहाचे हसू करत होते..

दिल्लीहून आलेल्या निरीक्षकांच्या उपस्थितीत ''सुजन अभियान'' अंतर्गत संस्थेमधील कर्मचाऱ्यांना एकत्रित करण्यात आले. मात्र, याच वेळी तळागाळातील कार्यकर्त्यांनी स्वतंत्र बैठक घेत पक्षातील वास्तव परिस्थिती स्पष्टपणे मांडली.

गेल्या अनेक वर्षांपासून केज तालुक्यात पक्ष संघटन मजबूत करण्याऐवजी काही मोजक्याच लाडावलेल्या पदाधिकाऱ्यांभोवती सत्ता केंद्रीत झाली असल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला. २० ते २५ वर्षांपासून निष्ठेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना दुय्यम वागणूक देण्यात



येत असल्याने त्यांच्यात नाराजी वाढत गेली आहे. घरच्या तालुक्यात हजार - दोनजाराचा वार्डातला १ ग्रामपंचायत नगरसेवक निवडून आणायला नाकीनऊ येतात, किती लाजिर वाणी गोष्ट आहे,

राज्यात काँग्रेस विरोधी पक्षात सोबत जाण्यामुळे फारकत घेते कार्यवाही करते मग केज मधील राहुल सोनवनेचा युवराज ग्रामनगरसेवक कोणा सोबत आहे? पदनियुक्त्या आणि निर्णय प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले. अनेक वेळा वरिष्ठांकडे तक्रारी करूनही त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे अनेक कार्यकर्ते निष्क्रिय झाले असून काहींनी पक्षापासून अंतर ठेवले आहे. लोकात ◀◀ पान ३ वर



**पक्षाच्या बैठकीला संस्थेचे कर्मचारी दाखविले कार्यकर्ते**

# खांडे पारगाव येथे नवनाथ बाबा यांची भव्य मिरवणूक

## हलगी, टाळ, मृदुंगाच्या तालावर भाविक भक्तांचा ठेका

बीड । प्रतिनिधी

गुरुवर्य शांतिब्रह्म नवनाथ बाबा महाराज श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांची दोन धाम यात्रा पूर्ण केल्याबद्दल व खांडे पारगाव येथे भिक्षा कार्यक्रमानिमित्त भव्य दिव्य अशी मिरवणूक काढण्यात आली.

खांडे पारगाव फाटा येथे गुरुवर्य शांती ब्रह्मा नवनाथ बाबा महाराज यांची रथा मधून वाजवत गाजवत तसेच महिलांनी आपापल्या दारामध्ये सडा रांगोळी करत नवनाथ बाबा यांचे अवक्षण करून मिरवणूक काढण्यात आले. गावामधील लहान मुलं मुली शाळकरी विद्यार्थी विद्यार्थिनी तरुण युवक युवती महिला मंडळी व पुरुष मंडळी गावातील लहान थोरांपासून सर्व मंडळींनी खांडे पारगाव फाटा येथे जमून गुरुवर्य नवनाथ बाबा यांचे जंगी स्वागत करण्यात आले शाळकरी मुलांनी नेहरू व टाळ असा पोशाख करत व मुलींनी साडी नेसून कळस नारळ डोक्यावर घेऊन भव्य दिव्य अशी वाजवत गाजवत मिरवणूक काढण्यात आली



खांडे पारगाव येथील ग्रामस्थांनी डीजे च्या अवाजवी खर्चाला फाटा देत गावातील शाळकरी विद्यार्थ्यांना गुरुवर्य नवनाथ बाबा महाराज यांच्या हस्ते शालेय साहित्य रजिस्टर सोबत इतर साहित्य वाटप करण्यात आले.गुरुवर्य नवनाथ बाबा महाराज यांची भव्य दिव्य मिरवणूक झाल्यानंतर ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते सर्व गावकरी व पंचक्रोशीतील नागरिकांना महाप्रसादाच्या पंगती करण्यात आल्या गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या आगमनाने संपूर्ण गाव आनंदमय झाले होते

# अ.भा.मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन उदगीर येथे

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शनिवारी उद्घाटन ;पत्रकारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

राज्यातील ३६ जिल्हे आणि ३५४ तालुक्यात शाखा विस्तार असलेली तसेच सुमारे १२ हजार सदस्य संख्या असलेली देशातील सर्वात मोठी आणि जुनी संघटना असलेल्या अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन १८ आणि १९ एप्रिल २०२६ रोजी रोजी उदगीर इथे होत आहे.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून लोकमतचे समुह संपादक राजेंद्र दर्डा अधिवेशनाचे उद्घाटन करतील. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

बांधकाम मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष आहेत तर आमदार संजय बनसोडे सह स्वागताध्यक्ष आहेत. परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख हे कार्यक्रमाचे अध्यक्ष असतील तर मिलिंद अष्टीवकर हे अधिवेशनाचे अध्यक्ष असतील. ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांचे मार्गदर्शन पत्रकारांना लाभणार आहे. १८ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता स्वामी विवेकानंद शैक्षणिक संकुलात अधिवेशनाचे उद्घाटन होईल. तत्पूर्वी उदगीर शहरातून प्रभात फेरी काढली जाणार असून त्यामध्ये शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी सहभागी होतील. दुपारच्या सत्रात उदगीरमधून बाहेर पडून पत्रकारितेच्या क्षेत्रात देदीप्यमान यश मिळविणाऱ्या पत्रकारांचा सत्कार आणि त्यांच्या मनोगताचा कार्यक्रम होईल.दुपारी ४ ते ५.३० या वेळेत लोकप्रतिनिधींच्या माध्यमांकडून अपेक्षा या विषयावर रोहीत पवार यांची मुलाखत घेतली जाणार आहे.. रात्री ७ वाजता मनोरंजनाचा कार्यक्रम होईल. १९ एप्रिल रोजी सकाळी ९.३० वाजता राष्ट्रवादीचे प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे याची मुलाखत होईल. पुढारी न्यूज चे संपादक प्रसन्न जोशी ही मुलाखत घेतील.. सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेत माध्यमं सत्ताधाऱ्यांना झुकतं माप देताहेत का? या विषयावरील परिसंवादात केशव उपाध्ये, हनुमंत पवार, सुरज चव्हाण, ◀◀ पान ३ वर

# गाडगेबाबांच्या विचारांची परंपरा जपणाऱ्या सभेत फुले-जयंती उत्साहात



बीड । प्रतिनिधी

कृतिशील समाजसुधारक, सत्यशोधक धर्माचे संस्थापक आणि शैक्षणिक-सामाजिक क्रांतीचे प्रणेते क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त बीड येथे अभिवादन करण्यात आले. याच वेळी शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांचे किर्तन-प्रवचनातून जनप्रबोधन करणारे ह.भ.प. मधुकर महाराज बारुळकर यांच्या अकाली निधनाबद्दलही भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

गाडगेबाबांच्या समाजसुधार अभियानाची पताका खांद्यावर घेत चळवळ पुढे नेणारे ह.भ.प. संतोष महाराज डोंगरे यांच्या निवासस्थानी आयोजित अभिवादन सभेत विविध मान्यवरांनी उपस्थित राहून आपली श्रद्धांजली अर्पण केली. जेष्ठ शिक्षक नेते व मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक प्राचार्य डी. जी. तांदळे, आम आदमी पक्षाचे अध्यक्ष अशोक येडे, प्रबोधनकार ह.भ.प. नितीन महाराज ◀◀ पान ३ वर

# मुस्लिम आरक्षण मोर्चात मोठ्या सख्येने सहभागी व्हा- राहुल जाधव

पाटोदा । प्रतिनिधी

मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी आरक्षण हा काळाची गरज असून,येणाऱ्या पिढीचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी १७ एप्रिल रोजी बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या मुस्लिम महाएल्गार आरक्षण मोर्चात सर्व राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी तसेच सर्वच समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल शाहुराव जाधव यांनी केले आहे.

यावेळी बोलताना राहुल जाधव म्हणाले की, हा मोर्चा मुस्लिम समाजाला आरक्षण मिळावे म्हणून आयोजन करण्यात आले आहे. हा मोर्चा वैयक्तिक स्वार्थाचा नसून संपूर्ण मुस्लिम समाजाच्या न्याय्य हक्कासाठी आहे. शिक्षण, नोकरी आणि विविध शासकीय योजनांमध्ये मुस्लिम समाजाला ५ टक्के आरक्षण मिळावे, ही समाजाची जुनी व रास्त ◀◀ पान ३ वर



**बीड : लाचलुचपत विभागाचे पोलीस आमलदार सांगळे यांची पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती झाल्यानंतर ते छत्रपती संभाजी नगरच्या वाळुज एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात रूजू झाले. छत्रपती संभाजी नगरचे बाळासाहेब कांगणे रांजनगाव, देवानंद पवार आदी मित्र परिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.**

# अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ थांबवा - कास्ट्राईब

माजलगाव । प्रतिनिधी

अनुसूचित जाती प्रवर्गाच्या आरक्षणातील उपवर्गीकरण संदर्भात नेमलेल्या न्या.बदर समितीचा अहवाल घोषित न करताच त्यावर हरकती व सूचना राज्य सरकारने मागविल्या आहेत.

मुळात शासनस्तरावर अती वेगाने याबाबत कार्यवाही सुरू आहे.सेवानिवृत न्यायाधीश अनंत बदर यांची समिती नियुक्त,अहवाल प्राप्त,कॅबिनेट मध्ये चर्चा आणि मुख्यसचिव यांची समिती नियुक्त व एक महिन्यात या समितीचा अहवाल मागणे.ही सर्व अतिशय वेगवान प्रक्रिया आहे.यामागे सरकारचा हेतू स्वच्छ व सामाजिक न्यायाचा दिसत नाही. माननीय सर्वोच्च न्यायालयाने एवढेच म्हटले की उपवर्गीकरण होऊ शकते.राज्य सरकार करू शकते.परंतु केलेच पाहिजे असे बंधन घातले नाही.एम्पिरिकल डाटा,ज्या आधारे उपवर्गीकरण करायचे तो योग्य असला पाहिजे असेही निर्देश आहेत.जनगणना २०२७ चा डाटा उपलब्ध झाल्यावर याबाबत विचार करण्यात यावा.व सदरील प्रक्रिया तात्काळ थांबवण्यात यावी अशी मागणी ईमेलद्वारे कास्ट्राईब कडून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांना करण्यात आली आहे.

उपवर्गीकरणाची कार्यवाही संविधानाच्या अनुच्छेद १४,१५,२१ व ४६ शी सुसंगत नाही.उपवर्गीकरण व्यावहारिकही नाही.उपवर्गीकरण केले तरी प्रत्येक गटात अती मागास राहणारच आहेत.अती मागासवर्गास लाभ देण्यासाठी उपवर्गीकरण हा उचित मार्ग नाही.उपवर्गीकरणासाठी जनगणनेचा अद्यावत डाटा उपलब्ध असणे आवश्यक आहे.२०११ च्या जनगणनेचा डाटा १५ वर्षापूर्वीचा आहे,त्यामुळे तो वापरता येणार नाही,खरे चित्र समोर येणार नाही.तेव्हा जनगणना २०२७ चा डाटा आल्यावर तो विचारात घेण्यात यावा.माननीय न्या.अनंत बदर यांचा अहवाल सार्वजनिक करण्यात आला नाही.त्यामुळे या अहवालात नेमके काय आहे?कशाचा आधार घेतला आहे?काय शिफारशी आहेत?हे कळायला मार्ग नाही.अहवाल सार्वजनिक करावा म्हणजे मुख्य सचिव समिती कडे योग्य आक्षेप नोंदविता येतील.सरकारने सगळ्या क्षेत्रात आरक्षण धोरणाची अंमलबजावणी इमानदारीने केली नाही.टक्केवारीनुसार अनुसूचित जातीची आरक्षित पदे,पदोन्नतीसह,प्रथम भरावीत.संविधानाने दिलेले आरक्षण हे राजकीय क्षेत्र, ◀◀ पान ३ वर







This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

मंगळवार दि.१४ एप्रिल २०२६ । पान ७

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार चितळे बंधू मिठाईवाले यांच्या ‘रांजे व्हिजन पार्क’चे उद्घाटन

**पुणे । प्रतिनिधी**

आपल्या चवदार व कुरकुरित बाकरवडीने जगभरात लोकप्रियता मिळवलेल्या व भारतातील प्रसिद्ध मिठाई, नमकीन व स्नॅक्सचे निर्माते असलेल्या चितळे बंधू मिठाईवाले यांच्या वतीने भोर तालुक्यातील रांजे येथे ‘रांजे व्हिजन पार्क’ या अत्याधुनिक उत्पादन प्रकल्पाची उभारणी करण्यात आली आहे. सदर प्रकल्पाचे उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते येत्या १६ एप्रिल रोजी संपन्न होईल, अशी माहिती चितळे बंधू मिठाईवाले या संस्थेचे भागीदार व चितळे कुटुंबातील चौथ्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारे इंद्रनील व केदार चितळे यांनी आज झालेल्या एका पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी बोलताना इंद्रनील चितळे म्हणाले, हा नवीन, अत्याधुनिक उत्पादन प्रकल्प भारतातील तसेच परदेशांतील बाजारपेठांमध्ये आमच्या विस्तार योजनेसाठी आवश्यक असलेल्या उत्पादनाच्या गरजा पूर्ण करेल. पॅक बंद खाद्यपदार्थांच्या क्षेत्रातील जागतिक मानके लक्षात घेऊनच या प्रकल्पाची रचना आणि उभारणी करण्यात आली आहे.

या प्रकल्पाला एफएसएससी २२००० हे जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त असलेले आणि ग्लोबल फूड सेफ्टी इनिशीएटिव्ह मानकांवर आधारित अन्न सुरक्षा प्रमाणपत्र मिळाले आहे. त्याचबरोबर या उत्पादन प्रकल्पाला युएस फूड अँड ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन आणि ब्रिटीश रिटेल कन्सोरशियम यांसारख्या जागतिक अन्न सुरक्षा मानकांनुसार देखील प्रमाणित करण्यात आले आहे. सुमारे २५



एकर जागेवर उभारण्यात आलेल्या रांजे व्हिजन पार्कमध्ये मिठाई आणि नमकीनसाठी दोन स्वतंत्र उत्पादन केंद्रांची उभारणी करण्यात आली असून ते कार्यन्वित देखील करण्यात आले आहेत. या उत्पादन केंद्रांची क्षमता दररोज ४० टन मिठाई आणि नमकीनचे उत्पादन करण्याची आहे. रांजे व्हिजन पार्कच्या उभारणीमध्ये आतापर्यंत २५० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे, अशी माहिती इंद्रनील चितळे यांनी दिली.

पुढे बोलताना केदार चितळे म्हणाले, या पार्कचे एक अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे हे ग्राहकांना पाहण्यासाठी खुले असेल. एक्सपीरियन्स सेंटर सारख्या संकल्पनेवर आधारित असलेल्या या पार्कमध्ये ग्राहकांना चितळे बंधू मिठाईवाले यांच्या सर्व उत्पादनांना एकाच ठिकाणी बघता येईल, त्यांची चव घेता येईल. तसेच नजीकच्या भविष्यात येथे एका कॅफेचीही योजना आखण्यात आली आहे. सर्वात महत्वाची बाब म्हणजे या पार्कमध्ये ग्राहकांसाठी व्ह्यूइंग गॅलरीज अर्थात निरीक्षण कक्ष उभारण्यात आले आहेत. या सुविधेमुळे ग्राहक चितळे बंधू मिठाईवाले यांची उत्पादने कशा प्रकारे संपूर्णतः स्वयंचलित उत्पादन प्रक्रियेच्या माध्यमातून तयार केली जातात व त्यादरम्यान होणारे स्वच्छतेचे व जागतिक दर्जाचे निकष यांचे काटेकोर पालन कसे केले जाते हे प्रत्यक्ष स्वतः पाहू शकतील.

याबरोबरच या ठिकाणी चितळे बंधू मिठाईवाले यांचा आजवरचा प्रवास दर्शवण्यासाठी तयार करण्यात आलेली १०० मीटर लांबीची विशेष भिंत ग्राहकांसाठी नक्कीच कुतूहलाचा विषय ठरेल. उत्पादन प्रक्रिया प्रत्यक्ष पाहण्यासाठी प्रोत्साहित करणारा हा उपक्रम, आमच्या ग्राहकांना केवळ आश्वस्तच करणार नाही, तर ग्राहकांच्या पिढ्यानपिढ्यांनी आमच्याशी जोपासलेले विश्वासाचे दृढ नाते अधिकच बळकट करेल अशी आशा केदार चितळे यांनी व्यक्त केली. लवकरच, ग्राहक या ‘रांजे व्हिजन पार्क’ला भेट देण्यासाठी संस्थेच्या वेबसाईटच्या माध्यमातून नोंदणी करू शकतील. भविष्यातील विस्तार योजनांविषयी माहिती देतांना इंद्रनील चितळे म्हणाले की, सध्या चितळे बंधू मिठाईवाले यांच्या वतीने वेगवेगळ्या ४५० पदार्थांचे उत्पादन करण्यात येते. रिटेल स्टोअर, क्विकसर्व्हिस व फाईन डाइन रेस्टॉरंटसच्या माध्यमातून ही उत्पादने जास्तीतजास्त ग्राहकांपर्यंत पोहोचावी यावर आमचा भर असेल. आजमितीला आमची उत्पादने देशाच्या १० राज्यांमधील सुमारे १ लाख २५ हजार टच प्वॉइंटसच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत पोहोचत आहेत. टच प्वॉइंटसची ही संख्या येत्या ३ वर्षात ५ लाखांवर नेण्याची आमची योजना आहे. सध्या निर्यातीतून होणारा व्यवसाय हा सुमारे ८ ते ९ टक्के असून येत्या २ ते ३ वर्षात तो २० टक्क्यांपर्यंत नेण्याचे आमचे उद्दिष्ट आहे, असे देखील चितळे यांनी नमूद केले.

# सीए फायनल परीक्षेत मोठा बदल; आता वर्षातून फक्त दोनदाच परीक्षा

**पुणे । प्रतिनिधी**

इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडिया अर्थात आयसीएआयने सीए फायनल परीक्षेच्या पद्धतीत एक मोठा बदल केला आहे. ही परीक्षा वर्षातून तीन वेळा घेण्याऐवजी आता दोनदा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. २०२६च्या सत्रापासून लागू होणाऱ्या या नवीन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांसाठी परीक्षेच्या संधीची संख्या कमी होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

यापूर्वी सीए फायनल परीक्षा जानेवारी, मे आणि सप्टेंबरमध्ये घेतली जात होती. त्यामुळे विद्यार्थ्यांना वर्षातून तीन संधी मिळत होत्या. परंतु, नवीन निर्णयानुसार ही परीक्षा आता फक्त मे आणि नोव्हेंबरमध्ये घेतली जाईल. आयसीएआयने दिलेल्या माहितीनुसार, हा निर्णय विद्यार्थी आणि इतर संबंधित घटकांकडून



मिळालेल्या अभिप्रायाच्या आधारे घेण्यात आला आहे. या बदलाचा परिणाम फक्त सीए फायनल परीक्षेवर होईल. फाउंडेशन आणि इंटरमिजिएट परीक्षांसाठी सध्या कोणतेही बदल जाहीर केलेले नाहीत. अभ्यासक्रम, उत्तीर्ण होण्याचे गुण, आर्टिकलशिप किंवा अभ्यासक्रमाच्या रचनेत कोणताही बदल केलेला नाही. सीएची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना पूर्वी वर्षातून तीन संधी मिळत होत्या, ज्यामुळे अनुत्तीर्ण झाल्यास त्यांना त्वरित दुसरी संधी मिळवता येत होती. परंतु, आता ही संख्या तीनऐवजी दोनवर आणली आहे. तज्ज्ञांच्या मते, कमी संधीमुळे विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या प्रकारे तयारी करण्यासाठी जास्त वेळ मिळेल. शिवाय, परीक्षांची संख्या कमी झाल्यामुळे आयसीएआयसाठी प्रश्नपत्रिका तयार करणे, परीक्षा घेणे, उत्तरपत्रिका तपासणे आणि निकाल जाहीर करणे, ही प्रक्रिया सोपी होईल. यामुळे संपूर्ण परीक्षा प्रणाली अधिक मजबूत आणि प्रभावी होण्यास मदत होणार असल्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. आयसीएआयने सीए इंटरमिजिएट परीक्षेच्या तारखांमध्ये बदल केला आहे. यापूर्वी ३ मे २०२६ रोजी होणारी ही परीक्षा आता ५ मे रोजी दुपारी २ ते सायंकाळी ५ या वेळेत घेतली जाईल. ग्राप १ च्या परीक्षा ५, ७ आणि ९ मे रोजी, तर ग्राप २ च्या परीक्षा ११, १३ आणि १५ मे रोजी घेण्यात येतील, असे देखील स्पष्ट करण्यात आले आहे.

# भेसळयुक्त मँगो पल्पचा ३,८०० किलो साठा जप्त, अन्न व औषध प्रशासनाची राक्षेवाडी येथे कारवाई



**राजगुरुनगर । प्रतिनिधी**

राक्षेवाडी(ता. खेड) येथे अन्न व औषध प्रशासना (एफडीए) सोमवारी(दि. १३) मोठी कारवाई करत भेसळयुक्त मँगो पल्पचा साठा जप्त केला. खेड आणि मावळ तालुक्यातून एकूण ३,८०० किलोग्रॅमहून अधिक भेसळयुक्त मँगो पल्प जप्त करण्यात आला आहे. याची किंमत लाखो रुपये आहे. या ठिकाणी मँगो पल्प तयार करताना आंब्याऐवजी साखरेऐवजी भेसळयुक्त पदार्थ, गाईचे दूध आणि केमिकलयुक्त केशरी रंग याचा वापर केल्याचे उघड झाले. स्वस्त दरात उपलब्ध होणाऱ्या या पल्पचा ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात वापर होत होता. स्थानिक हॉटेल्स, मिठाई दुकाने आणि घरगुती वापरासाठी तो पुरवला जात होता. अन्न व औषध प्रशासन अधिकाऱ्याने सांगितले की, या भेसळयुक्त पल्पमुळे जुलाब, उलट्या, पोटदुखी आणि अन्नातून विषबाधेचा धोका होऊ शकतो. दीर्घकाळ वापरल्यास कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा देखील धोका वाढू शकतो.

# ज्येष्ठ पत्रकार प्रकाश भोईटे यांचे निधन

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे श्रमिक पत्रकार संघ, पुणे पत्रकार प्रतिष्ठानचे माजी अध्यक्ष आणि पुणे जिल्हा नियोजन मंडळाचे माजी सदस्य ज्येष्ठ पत्रकार प्रकाश ज्ञानेश्वर भोईटे (वय ६२ रा. कोथळे, तालुका पुरंदर, जिल्हा पुणे) यांचे प्रदीर्घ आजाराने सोमवारी (दि.१३) दुपारी पुण्यात निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, वडील आणि तीन भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर कोथळे गावी कऱ्हा नदीकाठी आज, सोमवारी (दि. १३) रात्री आठ वाजता अंत्यसंस्कार होणार आहेत.



प्रकाश भोईटे यांनी पुढारी, देशदूत, ऐक्य, पुण्यनगरी, देशोन्नती या वृत्तपत्रांमध्ये प्रदीर्घकाळ वार्तांकन केले. सध्या ते दैनिक केसरीमध्ये कार्यरत होते. शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांच्याबरोबर त्यांनी काम केले आणि संघटनेचे पुणे जिल्हाध्यक्ष म्हणूनही त्यांची कारकीर्द गाजली होती. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्याबरोबर देखील त्यांनी काम केले. शेतकरी आणि पत्रकारांच्या प्रश्नावरील आंदोलनातही त्यांनी वेळोवेळी सहभाग घेतला होता. दि पूना मर्चन्टस चेंबरतर्फे दिला जाणारा कै. वी. ल. गवाडिया आदर्श पत्रकार पुरस्कार, पुणे जिल्हा परिषदेचे ग्रामस्वच्छता अभियान पारितोषिक त्यांना मिळाले होते. महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघाचे महासचिव, राज्य पत्रकार अधिस्वीकृती समिती सदस्य म्हणूनही त्यांनी काम केले. पत्रकार हल्ला विरोधी कायद्यासाठी देखील त्यांनी लढा दिला होता. राजकीय विषयावरील बातम्यामध्ये त्यांचा हातखंडा होता. त्यांच्या अनेक बातम्या राज्यभर गाजल्या. कृषि, सहकार, साखर विषयावरही त्यांनी निर्भीड पत्रकारिता केली. पुरंदर तालुक्यातील कोथळे गावच्या विकासामध्ये त्यांचा मोलाचा वाटा राहिला. अनेक लोकाभिमुख कामे त्यांनी गावांमध्ये उभी केली. कोथळे गावातील वाचनालयाचेदेखील अध्यक्ष होते. त्यांच्या पत्नी जयश्री भोईटे या कोथळे गावच्या लोकनियुक्त सरपंच आहेत. जेजुरी देवस्थानचे माजी अध्यक्ष अँड धनंजय भोईटे, माजी ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय भोईटे, पत्रकार प्रताप भोईटे हे त्यांचे बंधू होत.

# पुण्यात खळबळ! १० बांगलादेशींसह १३ तरुणी फरार; रेस्क्यू फाऊंडेशनमधील थरारक घटना

**पुणे । प्रतिनिधी**

मोहम्मदवाडीतील ससाणे वस्ती परिसरातील रेस्क्यू फाउंडेशनमधून १० बांगलादेशी तरुणींसह १३ जणींनी थरारक पद्धतीने पलायन केल्याची घटना समोर आली आहे. ही घटना २३ मार्च रोजी सकाळी ७ वाजता घडली असून, याबाबतचा एक व्हिडिओही समोर आला आहे. याप्रकरणी नुकताच काळेपडळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. यातील दोन तरुणी काही अंतरावरच आढळल्या असून त्यांना ताब्यात घेतले आहे.

या प्रकारामुळे संस्थेच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. पळून गेलेल्या सर्व तरुणी विविध



पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायदा (पीटा)) अंतर्गत पीडित आहेत. या तरुणींवर दिघी, फरासखाना, शिरूर, देहूरोड, जेजुरी, कोंढवा व नगर येथील पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे नोंद आहेत. या घटनेनंतर काळेपडळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील यांनी सांगितले की, या अकरा तरुणींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली असून, पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. या घटनेमुळे संबंधित संस्थेतील सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संस्थेमध्ये एकूण ४२ तरुणी आहेत. त्यातील ३२ बांगलादेशी आहेत. त्यातील काहीजणींची व्हिसाची मुदत संपल्यानंतरही त्या येथे वास्तव्यास होते. यातील तीन बांगलादेशी मुलींनी संस्थेतून पलायन करण्याचा कट आखला होता. सकाळी रेक्टररुममध्ये ज्येष्ठ महिला कर्मचारी एकटीच होती, तेव्हा तिच्या समोर कप्प्यात मुख्य गेटची चावी होती. ही संधी साधून कर्मचारी महिलेच्या तोंडात बोळा कोंबून हातपाय बांधण्यात आले. त्यानंतर गेट उघडून तिघींनी पलायन केले. त्या पाठोपाठ इतर मुलीही पळून गेल्या. चौकशीअंती गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पुणे विद्यापीठात खळबळ! उच्च शिक्षणमंत्र्यांची ‘त्या’ सदस्यांना कडक तंबी; कुलगुरूंची खुर्चीही धोक्यात?

**पुणे । प्रतिनिधी**

विद्येचे माहेरघर मानल्या जाणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्रशासन आणि अधिकार मंडळातील सदस्यांमध्ये उफाळलेल्या तीव्र संघर्षामुळे विद्यापीठाची प्रतिमा रसातळाला जात आहे. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि व्यवस्थापन परिषद सदस्यांमधील उघड आरोप-प्रत्यारोप, रखडलेली कुलसचिव नियुक्ती आणि ढासळत्या शैक्षणिक शिस्तीची गंभीर दखल घेत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी संबंधितांची कठोर शब्दांत कानउघाडणी केली. स्वतःच्या अधिकाराच्या मर्यादा ओळखा आणि विद्यापीठाची प्रतिष्ठा मलिन करू नका, असे सांगत त्यांनी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या सदस्यांना कडक तंबी दिली आहे. आपटे रस्त्यावरील एका आलिशान हॉटेलमध्ये चंद्रकांत पाटील यांच्या



अध्यक्षतेखाली ही महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यात विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषदेचे सर्व सदस्य व अधिसभेचे निवडक सदस्य, विद्यापीठाचे सल्लागार समितीचे सदस्य राजेश पांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी पाटील यांनी विद्यापीठाच्या चालू घडामोडींवर भाष्य करीत विनाकारण वाद घालणाऱ्या सदस्यांचे कान टोचले. विद्यापीठातील आरोप-प्रत्यारोपामुळे प्रशासनाचा पोरखेळ झाला आहे, यावर संताप व्यक्त करत त्यांनी एकमेकांवर चिखलफेक करण्यापेक्षा सामोपचाराने वागण्याचे निर्देश दिले. दरम्यान, विद्यापीठातील विस्कळीतपणा दूर करण्यासाठी आता राजेश पांडे यांच्याकडे सर्वाधिकार दिले असून, यापुढे विद्यापीठात पुन्हा एकदा पांडे सक्रीय राहणार आहेत. बैठकीत कुलगुरूंच्या कार्यपद्धतीवरही चर्चा झाली. लोणेरे येथील तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांचे उदाहरण देत पाटील यांनी स्पष्ट सूचक इशारा दिला. डॉ. काळे यांनाही तीन महिन्यांची संधी दिली होती, त्यानंतर त्यांचा राजीनामा घ्यावा लागला. डॉ. गोसावी यांनाही तीन महिन्यांचा कालावधी देऊ, सुधारणा न झाल्यास कुलगुरू आणि प्र-कुलगुरूंना समज द्यावी लागेल, असे म्हणत त्यांनी कुलगुरूंच्या खुर्चीवर टांगती तलवार असल्याचे संकेत दिले आहेत.

# क्षेत्रीय कार्यालय पुनर्रचनेवरून वाद; सुनेत्रा पवार यांची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महापालिका प्रशासनाने क्षेत्रीय कार्यालयांची पुनर्रचना चुकीच्या पद्धतीने केली आहे. त्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे, अशी तक्रार उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या तक्रारीची दखल घेऊन नगरविकास विभागाने क्षेत्रीय कार्यालयांच्या पुनर्रचनेसंबंधींचा अहवाल महापालिकेकडून मागविला आहे. महापालिका निवडणुकीनंतर १५ क्षेत्रीय कार्यालयांची पुनर्रचना प्रशासनाकडून करण्यात आली आहे. क्षेत्रीय कार्यालयांच्या नव्या रचनेनुसार १४ क्षेत्रीय कार्यालयांच्या प्रभाग समित्यांवर भाजपचे वर्चस्व निर्माण होणार आहे, तर काँग्रेसला एक प्रभाग समिती मिळणार आहे.

प्रशासनाच्या रचनेत झालेल्या राजकीय हस्तक्षेपामुळे दुसऱ्या क्रमाकांचे संख्याबळ असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला एकही प्रभाग समिती मिळू शकणार नाही, याबाबत राष्ट्रवादीच्या शिष्टमंडळाने आयुक्तांकडे तक्रारही केली होती. मात्र, भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या दबावामुळे आयुक्तांनी ही रचना दुरुस्त करण्याचे धाडस दाखविले नव्हते. दरम्यान, आता खुद्द उपमुख्यमंत्री पवार यांनीच याप्रकरणी मुख्यमंत्र्यांकडे क्षेत्रीय कार्यालयांच्या चुकीच्या पुनर्रचनेची तक्रार केली आहे. या तक्रारीत प्रामुख्याने



वडगाव शेरी मतदारसंघात येरवडा क्षेत्रीय कार्यालयाशी निगडित असलेल्या प्रभाग क्र. १ व २ नगर रोड क्षेत्रीय कार्यालयाला जोडण्यात आला, तर प्रभाग क्र. ४, ५ व ६ येरवडा क्षेत्रीय कार्यालयाला जोडण्यात आला आहे. प्रभाग क्र. ६ मध्ये खराडी, वाघोलीचा भाग येतो. या भागाला येरवडा क्षेत्रीय कार्यालय भौगोलिकदृष्ट्या लांबचे आहे. त्याचा फटका नागरिकांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे ही चुकीची रचना दुरुस्त करण्यात यावी, अशी मागणी पवार यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. दरम्यान, या तक्रारीनंतर आता नगरविकास विभागाने महापालिकेला पत्र पाठवून क्षेत्रीय कार्यालयांच्या पुनर्रचनेचा अहवाल मागविला आहे. त्यामुळे आता चुकीची रचना दुरुस्त होण्याची शक्यता आहे.

# शिरूरमध्ये एमडी ड्रग्ज जप्त; अल्पवयीन आरोपीकडून १.३८ लाखांचा मेफेड्रोन हस्तगत

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर बायपास परिसरात मेफेड्रोन (एमडी) विक्रीसाठी येणाऱ्या एका अल्पवयीन मुलाला स्थानिक गुन्हे शाखा व शिरूर पोलिसांनी सापळा रचून ताब्यात घेतले. त्याच्याकडून ६.९४ ग्रॅम



वजनाचा सुमारे १ लाख ३८ हजार ८०० रुपयांचा मेफेड्रोन हा अमली पदार्थ जप्त करण्यात आला.

ही कारवाई शनिवारी (दि. ११) अमली पदार्थविरोधी मोहिमेदरम्यान करण्यात आली. शिरूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत बंद पडलेल्या नाना स्पॉट हॉटेलजवळ एमडी विक्री होणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार कारवाई करत अल्पवयीन मुलाला ताब्यात घेऊन अंगझडती घेतली असता त्याच्याकडे अमली पदार्थ आढळून आला. याप्रकरणी शिरूर पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायदा कलम ८(क), २१(ब) तसेच बीएनएस कलम ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा व शिरूर पोलिस करत आहेत. ही कारवाई पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अप्पर पोलिस अधीक्षक रमेश चोपडे व उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर व पोलिस निरीक्षक संदेश केंजळे, पोलिस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, पोलिस हवालदार तुषार पंदारे, जनार्दन शेळके, राजू मोमीन, संजू जाधव, अक्षय कळमकर, नीरज पिसाळ यांनी केली.

# भोंदूगिरीचा धक्कादायक प्रकार! ‘त्या’ बाबाने महिलेकडून ५० लाख उकळले

**पुणे । प्रतिनिधी**

नाशिकमधील अशोक खरात, तसेच पुण्यातील ऋषीकेश वैद्य प्रकरण ताजे असतानाच एका भोंदूने दैवीशक्तीचा संचार असल्याची बतावणी करुन एका महिलेवर बलात्कार केल्याची घटना उघडकीस आले. कौटुंबिक वादात तोडगा काढण्याचे आमिष दाखवून भोंदूने महिलेवर बलात्कार केला. तसेच महिलेची ५० लाखांची फसवणूक केली. स्वारगेट पोलिसांनी या प्रकरणी औंदुबर मनोहर गडदे ( ४३, रा. तरटगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत ४२ वर्षीय महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, पीडित महिलेचे पतीशी पटत नव्हते. त्यांच्यात कौटुंबिक वाद झाल्याने ती वेगळी राहत होते. महिलेची पाच वर्षांपूर्वी एकामार्फत गडदे याच्याशी ओळख झाली. तेव्हा गडदे याने देवऋषी असून माझ्या अंगात दैवीशक्तीचा संचार आहे, अशी बतावणी केली. कौटुंबिक समस्या दूर करतो, असे सांगून त्याने महिलेला जाळ्यात ओढले. त्याने महिलेला स्वारगेट परिसरातील एका लॉजवर बोलावून बलात्कार केला. तसेच महिलेला माणगाव परिसरात बोलावून तेथेही लॉजवर बलात्कार केला. महिलेला नोकरी, तसेच बांधकाम व्यवसायात गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवून आरोपीने वेळोवेळी ५० लाख उकळले. काही रक्कम रोख स्वरुपात घेतली, तसेच महिलेकडून दागिने घेतले. गेले पाच ते सहा वर्ष हा प्रकार सुरू होता. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. झींपिश उीळाश पोलीस उपनिरीक्षक पाटील तपास करत आहेत. नाशिकच्या खरात प्रकरणानंतर दैवीशक्तीचा संचार असल्याची बतावणी करून पुण्यातील एका महिलेवर बलात्कार केल्याप्रकरणी ऋषीकेश श्रीकांत वैद्य (वय ३९, रा. वसई, जि. पालघर) याला अटक केली होती.